RNI : MAHMAR/2022/88796 Postal Regi.No:AMT/RNP/582/2026-2028 vidarbhkesari21@gmail.com www.vidarbhkesari.com Vidabh Kesari News 90969 45629 @vidarbhkesari

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
मुख्य संपादक : अमोल कंटाळे

अमरावती | सोमवार ३१ ऑगस्ट २०२६ | * वर्ष ६ * अंक १२९ * पृष्ठ : ६ * मूल्य रु : ३

## राज्यातील ४०४ पर्यटक नेपाळमध्ये सुखरूप

■ मुंबई : नेपाळ येथील महापुरामध्ये अडकलेले महाराष्ट्रातील नागरिक व धार्मिक पर्यटनासाठी गेलेले पर्यटक यांच्या मदतीसाठी विविध पातळीवर शासकीय यंत्रणा अहोरात्र प्रयत्न करत आहेत. सर्वजण सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत पोहोचण्यासाठी सतर्कतेने योग्य नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. आत्तापर्यंत प्राप्त माहितीनुसार राज्यातील ४०४ नागरिक सुरक्षित असून ३३८ नागरिकांशी संपर्क झाला आहे. राज्यातील ४५ जणांच्या पर्यटकांच्या ग्रुपने शनिवारी भारतीय हद्दीत प्रवेश केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून नाशिक, पुणे , मुंबई व अहिल्यानगर येथील नागरिक नेपाळ येथे गेले होते. महापुराच्या घटनेच्या कालावधीत हे नागरिक चितवन येथे होते. आज काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्याने नेपाळमधील लुंबिनी मार्गे त्यांना आणण्यात येत असून अयोध्या पोहोचल्यानंतर पुढील नियोजन शासनाच्या सूचनेनुसार केले जाणार आहे. शिवाय आणखीही काही पर्यटक लवकरच भारतात परतणार असल्याचे समजते.

## भीषण अपघात

**▸विदर्भ केसरी। खेड:**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर खेड तालुक्यातील लवेल पेट्रोल पंपासमोर रविवारी दि.३० रोजी सायंकाळी ५.१५ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. गोव्याच्या दिशेने जाणाऱ्या टाटा पंच मोटारीने रस्त्याच्या कडेला चालत असलेल्या दोन अल्पवयीन तरुणींना जोरदार धडक दिली. त्यानंतर मोटार रस्त्याच्या कडेला पलटी झाली. या अपघातात दोन तरुणींसह मोटारीतील महिला व पुरुष असे एकूण चार जण गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मोटार(एमएच १२ टीवाय ४३८१) गोव्याच्या दिशेने जात असताना लवेल पेट्रोल पंपासमोर हा अपघात झाला. मोटारीची दोन तरुणींना जोरदार धडक बसल्यानंतर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि मोटार रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. अपघातामुळे मोटारीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

## आंदोलनाला परवानगी नाकारली


**▸विदर्भ केसरी।**

ओबीसी समाजाच्या वतीने १ सप्टेंबर रोजी मुंबईतील आझाद मैदानात प्रस्तावित करण्यात आलेल्या आंदोलनाला मुंबई पोलिसांनी परवानगी नाकारली आहे. आंदोलनासाठी मल्लिकार्जुन पुजारी यांच्या नावाने पोलिसांकडे अर्ज करण्यात आला होता. मात्र, आझाद मैदान पोलिसांनी विविध कारणे नमूद करत आंदोलनास परवानगी देण्यास नकार दिला आहे. मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत दाखल झाल्यास आझाद मैदान परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तसेच परिसरातील रुग्णालयांच्या कामकाजावर आणि आपत्कालीन सेवांवरही गर्दीचा परिणाम होऊ शकतो, असे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# संविधानाच्या चौकटीतील मागण्यांवर दारे उघडी- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**▸विदर्भ केसरी।**

सहिष्णुता आणि सर्वसमावेशकता हाच हिंदू धर्म आणि हिंदुत्वाचा खरा गाभा अन् आत्मा आहे. हिंदूंच्या रक्तातच सहिष्णुता आहे, परंतु याचा अर्थ असा नाही की आम्ही कोणाचा मार खावा. कोणी हल्ला केला तर आम्ही प्रतिकार नक्कीच करू, पण हिंदू स्वतःहून कोणावरही हल्ला करत नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी अमेरिकेत केलेल्या वक्तव्याचे समर्थन करताना ते बोलत होते.



### समृद्धीवरील घटनेची गांभीर्याने दखल

■ देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, समृद्धी महामार्गावर घडलेली घटना अत्यंत गंभीर आहे. या घटनेची आम्ही गांभीर्याने दखल घेतली आहे. या प्रकरणी तात्काळ स्पेशल टास्क फोर्स स्थापन करून कठोर कारवाई करण्याचे निर्देश मी पोलिस महासंचालकांना दिले आहेत.

### जरांगेंच्या आंदोलनावर सकारात्मक मार्ग काढू

■ देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर तोडगा काढण्यासाठी सरकारचे प्रतिनिधी सातत्याने चर्चेसाठी उपस्थित आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे स्वतः मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर सातत्याने काम करत आहेत. यापूर्वीही आपण चर्चा करून मार्ग काढले आहेत आणि यावेळीही सकारात्मक मार्ग काढू. ज्या मागण्या कायदेशीर, संविधानाच्या चौकटीत बसणाऱ्या आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन न करणाऱ्या असतील, त्या सर्व मागण्यांवर चर्चा करण्यासाठी सरकारची दारे नेहमीच उघडी आहेत.

### प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढणे हे आमचे कर्तव्यच

■ देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, नेपाळमध्ये अडकलेल्या महाराष्ट्रातील आणि देशातील प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढणे हे आमचे कर्तव्यच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्याला एक महत्त्वाची शिकवण दिली आहे. जगात कुठेही भारतीय नागरिक संकटात अडकला असेल, तर भारत सरकार त्याच्या मदतीसाठी धावून जाते. याच धोरणानुसार आपण नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुरक्षितपणे परत आणण्यासाठी सर्वतोपरी मदत करत आहोत.

देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, हिंदू सभ्यता ही जगातील सर्वात प्राचीन संस्कृती आहे. जगभरातून अनेक आक्रमकांनी हल्ले केले, तरीही आपण आपली संस्कृती टिकवून ठेवली. इतकेच नव्हे, तर जगभरातून हाकलून लावलेल्या अनेक समाजांना आपण आपल्या संस्कृतीत सामावून घेतले आहे.

## पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा बुडून मृत्यू



**▸विदर्भ केसरी। ठाणे :**

कळवा रेतीबंदर येथील खाडीत पोहण्यासाठी गेलेल्या तिघांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी घडली. मुंब्रा येथील तिघे मित्र गणेश विसर्जन घाटावर पोहण्यासाठी गेले होते. मात्र, पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही बुडाले. अग्निशमन दल आणि पालिका आपत्ती व्यवस्थापन पथकाने सुमारे दीड तास शोधमोहीम राबवून तिघांचे मृतदेह पाण्याबाहेर काढले.

या घटनेची माहिती मिळताच कळवा पोलिस, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पाण्यात शोधकार्य सुरू करण्यात आले. सुमारे दीड तासाच्या अथक प्रयत्नांनंतर तिघांना पाण्याबाहेर काढण्यात यश आले. त्यांना तातडीने कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून तिघांचाही उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले.

मृतांमध्ये मुंब्रा येथील ठाकूरपाडा परिसरात राहणारे आलम सय्यद (४२), रिझवान सय्यद (४२) आणि साहिल पोलंदास (३०) यांचा समावेश आहे. तिघेही मित्र रविवारी दुपारी कळवा रेतीबंदर येथील गणेश विसर्जन घाटावर खाडीत पोहण्यासाठी गेले होते. दरम्यान, या घटनेची कळवा पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली असून, पोलिसांकडून पुढील कार्यवाही सुरू आहे. तिघा मित्रांचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याने मुंब्रा आणि कळवा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पुरामुळे आतापर्यंत 804 जणांचा बळी

### नेपाळमध्ये भारतीय न्यायवैद्यक आणि बोगदा बचाव पथके तैनात

**▸विदर्भ केसरी।**



नेपाळच्या जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यांमध्ये अडकलेल्या कर्मचाऱ्यांना वाचवण्यासाठी बचावकार्य अधिक तीव्र करण्यात आले आहे. सध्या या बोगद्यात सुमारे ८९८ कर्मचारी अडकलेले आहेत, तर आतापर्यंत ३६१ जणांची सुटका करण्यात आली आहे.

त्रिशुली-३ 'ए' जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात सुरू असलेल्या बचावकार्यात काही प्रमाणात यश मिळाले आहे. बचाव पथके माती आणि गाळ हटवण्यासाठी यंत्रसामग्रीचा वापर करत आहेत. बोगद्यात पाडलेल्या सहा इंचांच्या छिद्रातून एका पाईपद्वारे हवा आत सोडली जात आहे.

आता हे छिद्र मोठे करून त्याचे 'मॅनहोल'मध्ये रूपांतर करण्याची तयारी सुरू आहे, जेणेकरून बचाव पथके बोगद्यात प्रवेश करू शकतील आणि अडकलेल्या व्यक्तींचा शोध घेऊ शकतील. २६ ऑगस्ट रोजी नेपाळमधील भोटे कोशी आणि त्रिशुली नद्यांना अचानक पूर (फ्लॅश फ्लड्स) आला होता. या आपत्तीमुळे नेपाळमध्ये आतापर्यंत 788 जणांचा मृत्यू झाला आहे, तर तिबेटमधील मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे.

## राज्यातील १८ जिल्ह्यांत पावसाची तूट

**▸विदर्भ केसरी। मुंबई :**

राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे. यात मराठवाडा आणि विदर्भाचा समावेश असून काही जिल्ह्यांत ४० टक्क्यांहून अधिक तूट आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही पावसाचे प्रमाण कमी असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाने दिली.

येत्या २ सप्टेंबरपर्यंत राज्यात कुठेही अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता किंवा धोक्याचा इशारा देण्यात आला नाही. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत येत्या २ सप्टेंबरपर्यंत हलका ते मध्यम पाऊस पडू शकतो. गोंदिया, गडचिरोली, भंडारा जिल्ह्यांत काही ठिकाणी तुरळक व जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. मात्र कोणताही सतर्कतेचा इशारा नाही.

मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट मोठ्या प्रमाणात आहे. बीडमध्ये ४२ टक्के, जालन्यात ३५ टक्के, लातूरमध्ये २५ टक्के आणि धाराशिवमध्ये २८ टक्के तूट नोंदवण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर आणि परभणीसह इतर भागांतही पावसाच्या खंडाचा परिणाम जाणवत आहे. पावसातील खंडामुळे खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषत: पिकांना सध्या आवश्यक असलेल्या ओलाव्याची कमतरता निर्माण झाल्यास हलक्या जमिनीतील पिकांना अधिक ताण सहन करावा लागू शकतो.





छाया : धनंजय धबाले

# महायुती सरकार संकटातील बळीराजाच्या पाठीशी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**▸विदर्भ केसरी। परभणी :**

संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने ताण दिला आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत आहेत. या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा बिकट परिस्थितीत शेतक-यांना वा-यावर न सोडता महायुती सरकार खंबीरपणे शेतक-यांच्या पाठीशी उभा असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परभणीतील शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात बोलताना दिली.

परभणी शहरातील इंदिरा गांधी स्टेडीयम मैदानावर रविवार, दि. ३० ऑगस्ट रोजी शेतकरी व युवा संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे मेळाव्यास उपस्थित शेतकरी व युवकांना मार्गदर्शन करताना बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खा. संजय जाधव, आ. हिकमतदादा उडान, आ. सईद खान, माजी खा. ॲड. सुरेश जाधव, माजी आ. शंकरअण्णा धोंडगे, माजी आ. हरीभाऊ लहाने, परभणीचे माजी प्रथम महापौर प्रताप देशमुख, जिल्हाप्रमुख विशाल कदम, आनंद भरोसे, गंगाप्रसाद आनेराव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

### माझा आवाज कुणी बंद करू शकत नाही

■ शेतकरी व युवा संवाद मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे भाषण समारोपाकडे वाटचाल करत असताना अचानक माईकचा आवाज बंद झाला. त्यानंतर थोड्यावेळाने प्रयत्न केल्यानंतर माईक सुरू झाला. परंतू पुन्हा काही वेळातच माईक बंद झाला. त्यानंतर पुन्हा माईक सुरू झाल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी माझा आवाज कुणी बंद करू शकत नाही असा मिष्कील टोमना लगावला.

पुढे बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आजच्या शेतकरी व युवा संवाद मेळाव्याला असलेली गर्दी जमवलेली किंवा भाड्याची नसून मनापासून उपस्थित असलेल्या लाडक्या बहिणी, भाऊ व शेतक-यांची गर्दी आहे. महायुती सरकारने प्रत्येकाच्या नावापुढे आईचे नाव लिहीण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्राप्रमाणे राज्याने शेतक-यांना ६ हजार देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कर्जमाफी योजनेचा १२ शेतक-यांना लाभ मिळाला आहे. शेतकरी व युवकांच्या हिताच्या योजना प्राधान्याने सुरू राहतील. महायुती सरकार सदैव शेतक-यांच्या हिताचा निर्णय घेणारे असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

खा. संजय जाधव यांच्या मागणीनुसार परभणीत नवीन एमआयडीसी सुरू करण्यासाठी तात्काळ प्रयत्न करण्यात येतील. केवळ महानगरांचा नव्हे तर चांदा ते बांदा पर्यंतचा विकास करण्यासाठी सरकार कटीबध्द आहे. शेतक-यांना केवळ कर्जमाफी देऊन सरकार थांबणार नाही, तर त्यांना जोड उद्योग करण्यासाठी संधी देणार आहे. त्यासाठी परभणीत १.५ हजार कोटींची लवकरच गुंतवणूक करण्यात येईल. राजकारण करताना विकासाचा अजेंडा पाहिजे. विरोधात राहून विकास साधता येत नाही. त्यामुळे खा. संजय जाधव यांनी परभणीकरांच्या जीवनात बदल घडविण्यासाठी ख-या शिवसेनेत प्रवेश केला आहे. विकासाच्या या लढ्यात खा. जाधव यांच्या पाठीशी राहून परभणीकरांना रस्ते, गटार आणि स्वच्छ पिण्याचे पाणी देण्यासाठी सरकार सर्वतोपरी मदत करील असे आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले. यावेळी कृषी राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खा. संजय जाधव यांनी मेळाव्यास उपस्थित शेतकरी व युवकांना मार्गदर्शन केले. या मेळाव्याला लाडक्या बहिणी, युवक व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अग्रलेख

# शाळांची दुरवस्था

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे मृत्यू, आरोग्य सुविधांचा अभाव आणि शिक्षकांच्या हजारो रिक्त पदांमुळे कोकणातील शिक्षणव्यवस्थेचे विदारक वास्तव समोर आले आहे. पालघर जिल्ह्यातील मासवण शाळेत पहिलीमध्ये शिकणाऱ्या सात वर्षांच्या श्रेयांशचा मृत्यू आश्रमशाळेच्या प्रशासकीय यंत्रणांच्या डोळ्यात अंजन घालणारा होता. पालघर हा आदिवासीबहुल जिल्हा. येथील आश्रमशाळांमध्ये विविध कारणांवरून झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यूची संख्या ही बारापेक्षा जास्त आहे. जिल्ह्यात आश्रमशाळांचे पत्रे उडाल्याने मुले, मुली राहणार कुठे असा प्रश्न निर्माण झाला होता. विद्यार्थिनींनी आश्रमशाळेत न राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे एकूणच जिल्ह्यातील आश्रमशाळांचा प्रश्न गंभीर झाला होता. जिल्ह्यात ४८ पेक्षा जास्त आश्रमशाळा आहेत; मात्र येथील सोयीसुविधांचा बोजवारा उडालेला आहे. एकूण शासकीय आश्रमशाळा २७ आणि अनुदानित आश्रमशाळा २१ आहेत; मात्र सर्वच भागातील विद्यार्थ्यांच्या गैरसोयींबद्दल तक्रारी आहेत. विक्रमगडमधील विद्यार्थिनींच्या आंदोलनानंतर प्रशासनाला जाग येईल, अशी अपेक्षा होती; पण त्यानंतरही फार सुधारणा झालेल्या नाहीत. कोकणात बारा विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू आणि एकूण महाराष्ट्रात ५८४ विद्यार्थ्यांचे झालेले मृत्यू. विद्यार्थिनींना मिळत असलेली अपमानास्पद वागणूक असे अनेक प्रश्न आता उपस्थित झाले आहेत. पालघर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणात विशेष तपास पथक नेमले गेले. दोषी कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. शुद्धीकरण मोहीम हाती घेण्यात आली; परंतु गैरसोयी दूर झालेल्या नाहीत. मोखाडा, जव्हार, विक्रमगड हे दुर्गम तालुके आहेत. येथे विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा निर्माण करण्याच्या प्रयत्नांना गती मिळालेली नाही. पालघर, मासवण आश्रमशाळेत एकाच वेळी २४ विद्यार्थी आजारी पडले. दोघांचा मृत्यू झाला. ही वर्षभरापूर्वीची गोष्ट. या शाळेत ३९५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. येथे आणखी एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याने सुधारणा कुठल्या झाल्या, याचे उत्तर मिळालेले नाही. मुळात आदिवासी लोक हे जंगलात राहणारे. निसर्गात राहून त्यांची एकूण प्रतिकारशक्तीही अधिक सक्षम असते, तरीही विद्यार्थ्यांचे होणारे मृत्यू हे गंभीर विदारकता दाखवणारे आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे सर्पदंशाने झालेले मृत्यूही अधिक आहेत. सर्पदंशानंतर योग्य उपचार न मिळाल्याने हे मृत्यू झाल्याचे पुढे आले. काही मृत्यू हे तापसरीच्या साथीने झाले. एसआयटीचे निष्कर्ष अद्याप पुढे आलेले नाहीत; मात्र एकूणच विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे आश्रमशाळांमध्ये लक्ष दिले जात नाही, हा मुद्दा सार्वत्रिकपणे पुढे आला आहे. आदिवासी शाळांबरोबरच एकूण शासकीय प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळांमध्ये रिक्त पदे भरण्याबाबत सरकारचा दृष्टिकोन नकारार्थी आहे. कोकणातील एकूण २५ टक्के शाळांमध्ये इंग्रजी, गणिताचे शिक्षक नाहीत. सध्या शासन कोकणात शिक्षक नेमण्याबाबत कोणतीच भूमिका घेत नाही. शिक्षक अतिरिक्त असल्याचे सांगितले जाते; परंतु त्यांचे समायोजन होत नाही. परिणामी, पाच वर्षे रिक्त पदांमुळे शिक्षणाचा खेळखंडोबा झाला आहे. पालघर जिल्ह्यात आदिवासी शाळांमध्ये २ हजारांपेक्षा जास्त पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबतही ठोस निर्णय घेतला जात नाही. एका बाजूला कोकण बोर्ड दहावी, बारावी परीक्षेत उत्तम कामगिरी करत असताना शाळांची रिक्त पदे भरण्याबाबत भूमिका घेतली जात नसल्याने ही गुणवत्ता टिकविण्याचे मोठे आव्हान उभे राहणार आहे. शिक्षकांच्या नेमणुका होणे गरजेचे आहे. कोकणात एक शिक्षकी शाळांचा प्रश्न मोठा गंभीर आहे. जवळपास ४०० पेक्षा जास्त शाळा एकशिक्षकी आहेत. एका शिक्षकाने पाच, सात वर्ग कसे शिकवावेत? एक शिक्षकी शाळेच्या विद्यार्थ्यांनी नेमके काय करावे, हे आता शासनाकडूनच सांगितले गेले पाहिजे. एकूण शिक्षण व्यवस्थेबाबत असंख्य प्रश्न या ना त्या कारणांनी उपस्थित होत आहेत. पेपरफुटीवरून केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. राज्याच्या शिक्षण अव्यवस्थेवर मात्र सारेच मूग गिळून गप्प आहेत. आश्रमशाळेतील मृत्यू, प्राथमिक शिक्षणातील अव्यवस्था या सर्वच मुद्द्यांवर आता विचारमंथन होण्याची गरज आहे. कोकणात ग्रामीण भागात हा प्रश्न गंभीरपणे पुढे आला आहे. त्याचे निराकरण कसे करणार, हे शिक्षण विभागाने सांगितले पाहिजे.

# शेतीसाठी पाणी

- प्रा एल डी सरोदे
पत्रकार. मूर्तिजापूर
मो नं.7350850354.





महात्मा जोतीराव फुले यांनी १९ व्या शतकात 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथातून आणि विविध निबंधांतून मांडलेले कृषिविषयक विचार आजही तितकेच तंतोतंत आणि लागू पडणारे आहेत. माळरानावरील इंग्रज अधिकाऱ्याच्या बंगल्याभोवती फुललेल्या बागेचे उदाहरण देत फुले यांनी सिंचनाचे महत्त्व अधोरेखित केले होते. "जर योग्य नियोजन आणि पाण्याच्या उपलब्धतेची सोय केली, तर ओसाड रानातही हिरवळ फुलवता येते," हा त्यांचा संदेश आजच्या बदलत्या हवामानाच्या काळात अधिक गंभीर बनला आहे.

**महात्मा फुलेंची दूरदृष्टी आणि आजची वास्तवता जलसाठ्यांचे नियोजन.**

देशातील प्रत्येक भागात टप्प्याटप्प्याने धरणे, कालवे, विहिरी आणि लहान-मोठे तलाव बांधले जावेत, अशी आग्रही मागणी महात्मा फुलेंनी त्या काळात केली होती. पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते शेतीसाठी वापरले, तरच शेतकरी बारामाही पिके घेऊ शकेल, हा विचार त्यांनी मांडला.

आधुनिक 'एल निनो'चे संकट: आज आपण २१ व्या शतकात जगत असताना 'एल निनो'सारख्या हवामान बदलाच्या संकटांमुळे पावसाची अनिश्चितता प्रचंड वाढली आहे. कधी तीव्र दुष्काळ तर कधी अवकाळी पाऊस, यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. महात्मा फुलेंच्या जलव्यवस्थापनाच्या विचारांकडे झालेले दुर्लक्ष आजच्या कृषी संकटाला मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले आहे.


परंपरेची गरज.

केवळ मोठ्या धरणांवर अवलंबून न राहता स्थानिक पातळीवर पाणी साठवणे, पाझर तलाव निर्माण करणे आणि पाण्याचा थेंब अन् थेंब जमिनीत जिरवणे हीच आजच्या काळाची गरज बनली आहे. उद्याच्या समृद्ध शेतीचा मार्ग इंग्रज अधिकाऱ्याच्या बंगल्यातील बागेचे उदाहरण आपल्याला हेच शिकवते की, तंत्रज्ञान, नियोजन आणि कष्टाची सांगड घातली तर कोणतीही जमीन सुपीक करता येते. आजच्या काळात महात्मा फुलेंचे विचार प्रत्यक्षात आणायचे असतील, तर खालील गोष्टींवर भर देणे आवश्यक आहे:

सूक्ष्म सिंचनाचा वापर. ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करून उपलब्ध पाण्याचा जास्तीत जास्त कार्यक्षम वापर करणे.

विकेंद्रित जलसंधारण: विकेंद्रित पद्धतीने प्रत्येक गावात तलाव, बंधारे आणि विहिरींचे पुनर्भरण करणे.

हवामानरहित शेती नियोजन. 'एल निनो'सारख्या संकटांचा सामना करण्यासाठी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांची निवड करणे आणि जलसाठ्यांचे दीर्घकालीन नियोजन करणे. महात्मा फुलेंच्या विचारांचा वारसा केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्षात धोरणांमध्ये आणण्याची वेळ आता आली आहे. शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा हेच शेतकऱ्याच्या समृद्धीचे मुख्य सूत्र आहे.



# शिकाऱ्याचा नेम चुकला, शेतकऱ्याला लागला

## गोळी लागून शेतकरी गंभीर जखमी

**▸विदर्भ केसरी। अमरावती :**

चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचोली काळे येथे एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. शेतात हरणाची शिकार करणाऱ्या शिकाऱ्यांनी झाडलेली गोळी एका शेतकऱ्याच्या मांडीत घुसल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. ही घटना रविवारी सकाळी १०:३० ते ११:०० वाजताच्या सुमारास घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, चिंचोली काळे येथील महेंद्र शंकरराव शिरसाट यांच्या शेतात प्रशांत गोवर्धनराव मोहोळ (वय ३५, रा. चिंचोली काळे) हे फवारणीचे काम करत होते. याचदरम्यान बंदूक हातात घेतलेले चार अज्ञात इसम हरणाची शिकार करण्याच्या उद्देशाने शेतात घुसले. शिकाऱ्यांनी हरणांच्या कळपावर गोळी झाडली, मात्र दुर्दैवाने ती गोळी हरणाला न लागता शेतात काम करणाऱ्या प्रशांत यांच्या मांडीत जाऊन घुसली. आपल्याकडून शेतकरी जखमी झाल्याचे लक्षात येताच शिकाऱ्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. घटनेनंतर आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी तातडीने धाव घेत जखमी प्रशांत यांना उपचारासाठी अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले.घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजार पोलीस ठाण्याचे ठाणेदार सोनवणे यांनी तातडीने पावले उचलत जखमीचा जबाब नोंदवण्यासाठी पोलिसांचे एक पथक अमरावती रुग्णालयाकडे रवाना केले. चांदूरबाजार पोलीस सध्या या अज्ञात शिकाऱ्यांचा तीव्र शोध घेत आहेत.

### मोठा अनर्थ टळला; वन विभागावर संताप

- **ही गोळी जर शेतकऱ्याच्या छातीवर किंवा डोक्यावर लागली असती, तर प्रशांत यांचा जागीच मृत्यू झाला असता आणि मोठा अनर्थ घडला असता. चिंचोली काळे, चांदूरबाजार आणि मोर्शी परिसरातील जंगलांमध्ये नीलगाय, हरण, रानडुक्कर आणि मोर यांसारख्या वन्यजीवांची मोठ्या प्रमाणावर अवैध शिकार केली जात आहे. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे शिकाऱ्यांचे मनोबल वाढले असून ते आता थेट शेतात घुसून गोळीबार करण्यापर्यंत धजावले आहेत.**
- **दरम्यान, घटनेच्या वेळी काही शेतकऱ्यांनी शिकाऱ्यांचा व्हिडिओसुद्धा काढला असल्याचे समजते. या परिसरात वन्यजीव आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेसाठी वन विभागाने चांदूरबाजार व मोर्शी भागात तत्काळ कडक बंदोबस्त आणि गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांकडून केली जात आहे.**

# सावधान वनपरिक्षेत्रात वाघाची दहशत

## धामणगाव गढी वनपरिक्षेत्रात सतत तीन दिवस वाघोबाचे दर्शन : गाईचा पाडला फडशा

**▸विदर्भ केसरी।निलेश फाटकर**



**परतवाडा :** धामणगाव गढी वनपरिक्षेत्रात गेल्या तीन दिवसापासून वाघोबाचे दर्शन होत आहे 28 ऑगस्ट रोजी दत्तझीरी परिसरात बिबट्याने बकरीची शिकार केली, लगेच दुसऱ्या दिवशी देवगाव येथे तेथील नागरिकांना वाघोबाचे दर्शन झाले आणि रविवार रोजी धामणगाव गढी येथील शिवमंदिर परिसरात चक्क गुराख्याच्या समोरच वाघाने गाईवर हल्ला चढविला त्यामध्ये गाईच्या जागीच मृत्यू झाला

वाघोबाचे दर्शन नागरिकांमध्ये दहशत गेल्या अनेक दिवसांपासून आपण पाहतो की वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे जंगलाच्या ठिकाणी एकदम काठावर अनेक गावे वसलेली आहे आता जंगल म्हटले की तिथे प्राणी असणारच सुरुवातीच्या काळात परिस्थिती वेगळी होती पण दिवसेंदिवस माणूस जंगलाच्या दिशेने सुद्धा अतिक्रमण करायला लागला आहे म्हणूनच वन्य प्राण्यांच्या हल्ल्याचे प्रमाण सुद्धा वाढले आहे. धामणगाव गढी परिसरात शिव मंदिर या ठिकाणी रविवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास चक्क गुराख्याच्या समोरच वाघाने गाईवर हल्ला चढविला त्यामध्ये गाईचा जागीच मृत्यू झाला सुदैवाने त्या गुराख्याचे प्राण वाचले घटनेची माहिती वनविभागाला मिळतात तात्काळ वन विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचून पंचनामा करून पुढील कार्यवाही करत आहे. वन विभागाकडून या परिसरात ट्रॅप कॅमेरे सुद्धा लावण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे देवगाव जलालपुर या ग्रामपंचायतीला वनविभागाकडून पत्र पाठवून नागरिकांना सतर्क राहण्याचे आव्हान वनविभागाने केले आहे.

### मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यानो सावधान

- **धामणगाव गडी येथून शिवमंदिर अवघ्या एक किलोमीटर अंतरावर असल्याने येथील नागरिकांची सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे काही तर सकाळी चार वाजताच निघतात त्या नागरिकांनी आता या ठिकाणी मॉर्निंग वॉकला जाणे टाळायला पाहिजे**

### सावधानी बाळगावी - डीसीएफ अर्जुना सर

- **धामणगाव गढी शिव मंदिर परिसरात वनप्राण्याने गाईवर हल्ला केल्याची माहिती मिळाली त्या अनुषंगाने वन विभागाकडून त्या वन्य प्राण्यांची शोध मोहीम राबवली जात आहे. सध्या हा वाघ आहे की बिबट हे चौकशीनंतर स्पष्ट होईल परिसरातील नागरिकांनी जंगल परिसरात जातांना सावधानी बाळगावी आणि सतर्क राहावं असे आवाहन डीसीएफ अर्जुना सर यांनी केले आहे.**

# पाण्याचा अंदाज चुकला : युवकाचा बुडून मृत्यू



**▸विदर्भ केसरी। प्रेमदास तायडे, मेळघाट**

चिखलदरा : चिखलदरा तालुक्यातील शेवटचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोवडवाघोली येथील भुलेश्वरी नदीवर असलेल्या मध्यम पाटबंधारे प्रकल्प भुलेश्वरी धरणात पर्थोट येथील एका युवकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे पर्थोट गावात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पर्थोट येथील तीन युवक भुलेश्वरी धरण परिसरात फिरण्यासाठी आले होते. यावेळी तिघेही आंघोळ करण्यासाठी धरणाच्या पाण्यात उतरले. त्यापैकी दोघांना पोहता येत होते. मात्र, मोहम्मद तौसीफ बब्लू मुलाजी (वय १८ वर्षे) हा खोल पाण्यात गेल्याने पाण्यात बुडाला. युवक बुडाल्याची माहिती मिळताच परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती पथरोट पोलीस ठाण्याला मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. ट्राफिक जमादार दहीकर तसेच अंजनगाव सुर्जी येथील गोताखोरांच्या मदतीने धरणातील खोल पाण्यात शोधमोहीम सुरू करण्यात आली. सुमारे दोन तास शोध घेतल्यानंतर गाळामध्ये अडकलेला मोहम्मद तौसीफ याचा मृतदेह अखेर गोताखोरांच्या हाती लागला. या घटनेची वार्ता पर्थोट गावात पोहोचताच नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली. मृत युवकाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### धरण परिसरात सुरक्षा व्यवस्था करण्याची मागणी

- **भुलेश्वरी धरणात यापूर्वीदेखील अनेक नागरिकांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे. धरणातील खोल पाणी आणि धोकादायक ठिकाणांबाबत पोलिसांकडून नागरिकांना वारंवार पाण्यात उतरू नये, असा इशारा देण्यात येतो. मात्र, काही नागरिकांकडून या सूचनांकडे दुर्लक्ष होत असल्याने अशा दुर्घटनांचे प्रमाण वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भुलेश्वरी धरण परिसरात सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावावेत तसेच सुरक्षा व्यवस्था वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.**

## शब्दकोडे क्रमांक ३१६०

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | ५ | ■ |
| ६ | | ■ | ७ | | | ■ | ८ |
| | ■ | ९ | | | ■ | १० | |
| ■ | १२ | | | ■ | १३ | | |
| १४ | | | ■ | १५ | | | ■ |
| १६ | | ■ | १७ | | | ■ | १८ |
| | ■ | १९ | | | ■ | २० | |
| ■ | २१ | | | ■ | २२ | | |

**आडवे शब्द** : १) सजावट; शोभिवंत मांडणी, ३) मोराने फुलविलेली पिसे, ६) अश्व, घोडा, ७) पती, ९) काक, वायस, १०) वारा, वायू, १२) उत्कर्ष, भरभराट, १३) अंधार, १४) रात्रीची चुकामूक; भूल पाडणारे पिशाच्च, १५) हवेली, मोठे घर, १६) ओठांवर लावायचा रंग; गालावरील तांबडेपणा, १७) प्रस्तुत करणे, १९) शंकराचे एक नाव, २०) एक आणि पाव मिळून होणारी संख्या, २१) अन्य, हे सर्व सोडून बाकीचे, २२) साधू, चांगला मनुष्य.

**उभे शब्द** : १) परसू, इमारतीभोवतीचे अंगण, २) तयार, मान्य, कबूल, ३) पीतवर्णी, ४) सर्व; शेतीवरील कर, ७) नवी पालवी, तारुण्याचा भर, ८) सुगंध, ९) गोंगाट, सरोवर, १०) हल्ला, आक्रमण, १२) दिवाळीतील वेढ्यावेढ्याची मिठाई, १३) बिनवासाचे पांढरे फूल, १४) तल्लख, धूर्त, हुशार, १५) जहाजांचा तळ; वानर, १७) शर्करा, १८) तरुण; सैनिक, १९) वावर, मळा, २०) तयार, नटविलेले.

**शब्दकोडे क्रमांक ३१५९ चे उत्तर : आडवे शब्द** : १) निर्णय, ३) प्रसंग, ५) जळू, ७) नयन, ९) आठवण, १०) दुकान, १२) माहेर, १४) धन्वंतरी, १५) कलम, १७) मोड, १८) वाटप, १९) बासरी. **उभे शब्द** : १) निर्जन, २) यजन, ४) संघटन , ६) गणना, ८) यती, ९) आकार, १०) दुहेरी, ११) साधना, १२) मातकट, १३) सैल, १५) कडबा, १६) मदारी.

**सुडोकू क्र. ४५०९**

| | | | |
|---|---|---|---|
| २ | | | ४ |
| | ४ | | |
| ४ | | | |
| | | ४ | |

**कसे सोडवाल सुडोकू?**
सुडोकू सोडवताना उभ्या आणि आडव्या चार कॉलममध्ये एक ते चार हे अंक उभे किंवा आडवे असे बसवा की ते एका सरळ रेषेत एकदाच आले पाहिजेत.

**उत्तर क्र. ४५०८**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ४ | ३ | २ |
| २ | ३ | १ | ४ |
| ३ | २ | ४ | १ |
| ४ | १ | २ | ३ |



# रक्षाबंधनानिमित्त नशामुक्तीचा संकल्प.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर**

रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त ब्रह्माकुमारीज हिरपूर सेंटरच्या वतीने नशामुक्तीचा संदेश देत भावांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. 'लाडली बहना का ये संदेश, नशे से हमेशा दूर रहना' या संदेशातून समाजात व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हासंचालिका राजयोगिनी सीतादीदी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक तथा महामंत्री अटल फाउंडेशन महाराष्ट्र राज्य विष्णू लोडम , ग्रामीण पत्रकार संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास नसले उपस्थित होते. यावेळी मुर्तीजापूरच्या तहसीलदार शिल्पा बोबडे यांची अकोला उपजिल्हाधिकारीपदी निवड झाल्याबद्दल ब्रह्माकुमारीज हिरपूरच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. शिल्पा बोबडे यांच्या हस्ते हिरपूर सेंटरचे प्रवीणभाई यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला सोपानभाई, प्रवीणभाई, देवानंद भाई, ॲड. दिलीप देशमुख, प्रवीण धामणे, शुभदा कुलकर्णी ताई, अवधूत वसु, सुदाम तायडे, अशोक राऊत, गावंडे, गुल्हाने, शामराव डहाके, आशिष गावंडे, , अनिल ढगे, दिलीप तिहिले, सुयोग वऱ्हेकर आणि सोळंके बाप्पू यांच्यासह ब्रह्माकुमारीज परिवारातील सदस्य, परिसरातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून, एकमेकांच्या जीवनाचे रक्षण करण्याची आणि चांगल्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणारा पवित्र बंध आहे. त्यामुळे बहिणींनी भावांकडून रक्षाबंधनाची भेट म्हणून नशामुक्त जीवन जगण्याचा संकल्प करून घ्यावा, असा प्रेरणादायी संदेश यावेळी देण्यात आला. तंबाखू, गुटखा, दारू, सिगारेट यांसारख्या व्यसनांमुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक, सामाजिक तसेच कौटुंबिक परिणाम होत आहेत. विशेषतः तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकू नये, यासाठी समाजात सातत्याने जनजागृती करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी, संस्कारित आणि आनंदी जीवन जगावे, असा संदेशही उपस्थितांनी दिला. रक्षाबंधनाच्या निमित्ताने 'भाऊ-बहिणीच्या प्रेमासोबत व्यसनमुक्त जीवनाची राखी' हा विचार पुढे नेत प्रत्येक कुटुंबाने नशामुक्तीचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मुक्ता दीदी यांनी केले 'स्नेह, शांती आणि भावनेचे अतूट बंधन निर्माण करून नशामुक्त समाज घडवूया,' या संदेशाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 1, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629



## विहिरीवरील विद्युत पंप चोरणारे तिघे गजाआड

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

मांगुळ (ता. यवतमाळ) शिवारातील शेतातून विहिरीवर लावलेला १६ हजार रुपये किमतीचा पाण्याचा पंप चोरून नेत असताना तिघांना रंगेहात पकडण्यात आले. पवन कांबळे (वय २७) यांच्या तक्रारीवरून प्रवीण डोकडे (वय २०), रोहन बेहेकर (वय २०, दोघे रा. बारड तांडा) आणि रोशन लिल्लारे (वय २५, रा. हिरडा, ता. कळंब) यांच्याविरुद्ध यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# जि.प. कर्मचारी पतसंस्थेच्या सभासदांना 14 टक्के लाभांश

### गृहकर्ज 9 तर मालमत्ता तारण कर्ज 10 टक्के व्याजदराने; 5 सप्टेंबरपासून शाखांमध्ये लाभांश वाटप

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**



जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., यवतमाळ (नोंदणी क्र. १०९) च्या सभासदांना यंदा त्यांच्या भागभांडवलावर तब्बल १४ टक्के लाभांश देण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष महेश सोनेकर यांनी संस्थेच्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही घोषणा केली. येत्या ५ सप्टेंबरपासून संस्थेच्या विविध शाखांमध्ये लाभांश वाटपाला सुरुवात होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्थेची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शेतकरी भवन, साई मंदिराच्या मागे, मारेगाव रोड, वणी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या प्रारंभी देशासाठी शहीद झालेल्या जवानांना, दिवंगत राजकीय नेत्यांना, पूरस्थितीत मृत्यू झालेल्या नागरिकांना तसेच संस्थेच्या दिवंगत सभासद व ठेवीदारांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सभेत विषयपत्रिकेवरील एकूण ११ विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सर्व प्रस्ताव सभासदांच्या उपस्थितीत सर्वसंमतीने मंजूर करण्यात आले. सभासदांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना अध्यक्ष महेश सोनेकर यांनी समाधानकारक उत्तरे दिली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेला ३६ कोटी ७३ लाख ३३ हजार ९३२ रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती अध्यक्षांनी दिली. त्यापैकी १४ टक्के दराने ५ कोटी २ लाख ६४ हजार रुपये लाभांश सभासदांना वितरित करण्यात येणार आहे. लाभांशाचे वाटप संस्थेच्या मुख्य कार्यालयासह पुसद, वणी, दारव्हा, आर्णी आणि पांढरकवडा येथील शाखांमधून करण्यात येणार आहे. लाभांश वाटप सुरळीत होण्यासाठी सभासदांनी आपला स्थानिक पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक संस्थेच्या कार्यालयात येऊन अद्ययावत करून घेण्याचे आवाहन करण्यात आले. सभासदांच्या हिताचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत संस्थेने कर्जाच्या व्याजदरात अर्ध्या टक्क्याने कपात केली आहे. त्यानुसार आता गृहकर्ज ९ टक्के, तर मालमत्ता तारण कर्ज १० टक्के व्याजदराने उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे संस्थेच्या हजारो सभासदांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. संस्थेच्या कार्याचा आढावा देताना सभेत सांगण्यात आले की, सभासदांना कमाल ५० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज एका दिवसात उपलब्ध करून दिले जाते. तसेच पगारदार वर्गाच्या पतसंस्थांमध्ये १४ टक्के लाभांश देणाऱ्या संस्थांमध्ये जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था अग्रस्थानी असल्याचे सांगण्यात आले. संस्थेचे सभासद भागभांडवल ३३ कोटी ९६ लाख रुपये, गुंतवणूक १८८ कोटी रुपये, तर आतापर्यंत सभासदांना २३७ कोटी १० लाख रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. संस्थेकडे ४२ कोटी १५ लाख रुपयांचा राखीव निधी असल्याची माहितीही सभेत देण्यात आली. यावेळी गेल्या २२ वर्षांहून अधिक काळ कर्करोगग्रस्त रुग्णांना नवजीवन देण्यासाठी कार्यरत असलेले समाजसेवक प्रा. सतीश मुस्कुंदे यांचा संस्थेच्या वतीने विशेष नागरी सत्कार करण्यात आला. त्यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या निःस्वार्थ आणि मानवतावादी सेवाकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेच्या कुटुंब आधार योजनेअंतर्गत २८ दिवंगत सभासदांच्या वारसांना तब्बल २ कोटी २८ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आल्याची माहिती सभेत देण्यात आली. सभासद व त्यांच्या कुटुंबीयांच्या हिताला संस्थेने नेहमीच प्राधान्य दिले असून, भविष्यातही विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून सभासदांना अधिकाधिक लाभ देण्याचा प्रयत्न राहील, असे अध्यक्ष महेश सोनेकर यांनी सांगितले. सभेत संस्थेचे सचिव संजय बीहाडे यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी उपाध्यक्ष संजय गावंडे, संचालक शरद घारोडे, मुकेश भोयर, अशोक चटप, विनोदकुमार कदम, गजानन पोयाम, तुपार आत्राम, प्रदीप मोहटे, नदीम पटेल, अभिजीत ठाकरे, स्वप्नील फुलमाळी, विलास टोंगे, सचिन ठाकरे, तेजस तिवारी, सुनीता गुघाने, विजया राऊत यांच्यासह जिल्हाभरातून मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

## महत्त्वाचे



### रक्षाबंधन उत्साहात; पोलिसांसह वृक्षांना बांधली राखी

**▸विदर्भ केसरी। कळंब प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी, देशभक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत कळंब येथील शिवशक्ती उच्च प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांच्या माध्यमातून रक्षाबंधन उत्साहात साजरे करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आशिष महाजन होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रवीण देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणातून रक्षाबंधनाचे महत्त्व विशद केले. पोलीस दलातील जवानांप्रती प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांनी कळंब पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक महिंद्र साळवे तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले. या उपक्रमातून पोलीस दलाच्या देशसेवेप्रती विद्यार्थ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली .यानंतर विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षपूजन करून झाडांना राखी बांधण्यात आली. वृक्ष हे आपले जीवनातील खरे सोबती असून त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी यावेळी केला. पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्या मार्गदर्शनातून राष्ट्रीय सुरक्षा, देशभक्ती आणि नागरिकांचे कर्तव्य याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक आशिष महाजन यांनी वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. संत तुकाराम महाराजांच्या "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या अभंगातील ओळींचा दाखला देत वृक्ष हे आपले खरे सोयरे असून त्यांचे जतन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर होले यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवम चांदोरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनोज शिवरकर, सौ. प्रांजली दरणे, कु. चंद्रभागा मेश्राम आणि महेश लिपटे यांनी विशेष परिश्रम घेतले.



### झाडाला राखी बांधून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**▸विदर्भ केसरी। रिसोड...**

रक्षाबंधनाच्या सणाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत रिसोड तालुक्यातील खडकी सदार जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी अनोखा उपक्रम राबवला आहे. विद्यार्थ्यांनी प्लास्टिकचा वापर टाळून विविध प्रकारच्या बीज राख्या तयार केल्या असून, या राख्यांमधून भविष्यात झाडे उगवणार आहेत. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंकर पाटील सदार, गजानन सदार, अमोल सदार, सचिन सदार तसेच मुख्याध्यापक व सर्व शिक्षक मंडळी उपस्थित होते. रक्षाबंधनाच्या पारंपरिक संकल्पनेला पर्यावरण संवर्धनाची जोड देत राबविण्यात आलेल्या या उपक्रमात इयत्ता पहिली ते सातवीतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून, झाडे ही केवळ निसर्गाची शोभा नसून मानवाच्या जीवनाचा आधार आहेत, ही भावना प्रत्यक्ष कृतीतून व्यक्त केली. ज्याप्रमाणे राखी बांधून आपण आपल्या भावाच्या रक्षणाची भावना व्यक्त करतो, त्याचप्रमाणे वृक्षांना राखी बांधून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे,' असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला. झाडे आपल्याला प्राणवायू, सावली, फळे तसेच पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी मोलाचे योगदान देतात. त्यामुळे वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करणे ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

# राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात साजरा

### मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना क्रीडा व शिस्तीचा संदेश

**▸विदर्भ केसरी। सुयोग गोरले**





चांदूर बाजार : हॉकीचे जादूगार आणि भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा राष्ट्रीय क्रीडा दिवस निर्मिती पब्लिक स्कूल, नानोरी रोड, चांदूर बाजार येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तुषार खोंड सर, उपप्राचार्य अजीम सौदागर सर, माधुरी मॅम, कुरेकर मॅडम, मनीष राऊत मॅडम तसेच क्रीडा शिक्षक सुयोग गोरले सर यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी क्रीडा शिक्षक सुयोग गोरले सर यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय क्रीडा दिवसाचे महत्त्व सांगितले. खेळामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेसोबतच मानसिक ताकद, आत्मविश्वास, नेतृत्वगुण, शिस्त आणि संघभावना विकसित होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच नियमितपणे कोणत्याही एका खेळाचा सराव करावा आणि आपल्या आवडत्या खेळामध्ये सातत्याने मेहनत घेऊन देशाचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन त्यांनी केले. उपप्राचार्य अजीम सौदागर सर यांनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या उत्कृष्ट हॉकी कौशल्याच्या जोरावर भारताला जागतिक स्तरावर गौरव मिळवून दिला. त्यांच्या जीवनातून मेहनत, शिस्त, समर्पण, सातत्य आणि देशप्रेमाची प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून भारतात दरवर्षी २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केला जातो. या दिवसामागील मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये खेळांविषयी जागरूकता निर्माण करणे, क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणे तसेच युवा पिढीला शारीरिकदृष्ट्या सक्षम बनवणे हा आहे. कार्यक्रमास शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांच्या महान कार्याचे स्मरण करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिवसाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्राबद्दल नव्या उत्साहाची आणि प्रेरणेची भावना निर्माण झाली.



## फांद्यांमुळे वाहनचालकांना अडथळा

**▸विदर्भ केसरी। शेलुबाजार वार्ता**

शेलुबाजार ते मालेगाव मार्गावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना असलेल्या झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात वाढून रस्त्याकडे पसरल्या आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत असून, विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा प्रकार धोकादायक ठरत आहे. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या रस्त्याच्या दिशेने झुकल्याने मोठ्या वाहनांना तसेच प्रवासी वाहनांना वाहतूक करताना अडचणी निर्माण होत आहेत. पावसाळ्यात जोरदार वाऱ्यामुळे या फांद्या तुटून रस्त्यावर पडण्याची शक्यता असून, त्यामुळे अपघात होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. हा मार्ग परिसरातील नागरिकांसाठी तसेच विविध गावांतील प्रवाशांसाठी महत्त्वाचा असल्याने संबंधित महामार्ग विभागाने रस्त्याकडील वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची तातडीने छाटणी करावी, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून करण्यात येत आहे. वेळीच झाडांची छाटणी करून रस्ता सुरक्षित व अडथळामुक्त करण्यात यावा, जेणेकरून संभाव्य अपघात टाळता येतील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## आज घाटंजी येथे काँग्रेसचे धरणे आंदोलन

**▸विदर्भ केसरी। तालुका प्रतिनिधी - अरविंद चौधरी**

घाटंजी : काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. मल्लिकार्जुन खर्गे साहेब यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर कार्यक्रमस्थळी करण्यात आलेल्या "शुद्धीकरणाच्या" अपमानास्पद कृतीचा निषेध म्हणून उद्या घाटंजी येथे जाहीर धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

मनुवादी व विषमतावादी मानसिकतेचा जाहीर निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. खर्गे साहेबांचा अपमान हा देशातील प्रत्येक समतावादी नागरिकाचा अपमान असल्याची भावना काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आहे.मनुस्मृती नको - संविधान हवे! जातिभेद नको - मानवता हवी! विषमता नको - समता हवी!" समता - स्वातंत्र्य - बंधुता - न्यायया घोषणांसह हे आंदोलन होणार आहे. हे धरणे आंदोलन जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष श्री. जितेंद्रभाऊ मोघे व घाटंजी तालुका प्रभारी श्री. निमिष मानकर यांच्या नेतृत्वात होणार आहे.

दिनांक : ३१ ऑगस्ट २०२६, वेळ : सकाळी ११ वाजता* स्थळ : जयस्तंभ समोर, पोलीस स्टेशन चौक घाटंजी या आंदोलनात काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी, सर्व आघाड्यांचे सदस्य, पदाधिकारी तसेच समतावादी विचारांच्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन घाटंजी तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## अखेर सुनावणीची तारीख जाहीर

### गजानन खरबडे यांच्या हरकतींमुळे प्रशासन 'अलर्ट मोड'वर!

**▸विदर्भ केसरी। मंगरूळपीर**



मौजे बालदेव येथील गट क्रमांक ६५ मधील शासकीय जागेवर प्रस्तावित मैला प्रक्रिया केंद्राच्या उभारणीविरोधातील ग्रामस्थांचा लढा आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची आणि हरकतदार गजानन पुंडलिक खरबडे यांच्या आक्रमक भूमिकेची प्रशासनाने दखल घेतली असून, अखेर या प्रकरणातील सुनावणीची तारीख जाहीर करण्यात आली आहे.

बालदेव ग्रामस्थांच्या हरकतींनंतर शासकीय यंत्रणा आता या प्रकरणात सक्रिय झाली असून, २ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालय, मंगरूळपीर येथे महत्त्वपूर्ण सुनावणी होणार आहे.

**ग्रामसभेचा विरोध; ग्रामस्थांचा ठाम निर्धार**

मंगरूळपीर नगर परिषदेकडून संबंधित शासकीय जागेवर मैला प्रक्रिया केंद्र उभारणीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. मात्र, या प्रकल्पामुळे पर्यावरण, ग्रामस्थांचे आरोग्य आणि भावी पिढीच्या भविष्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी एकजुटीने प्रकल्पाला विरोध केला असून, ग्रामसभेतही सर्वानुमते विरोधाचा ठराव मंजूर करण्यात आल्याची माहिती आहे. हरकतदार गजानन पुंडलिक खरबडे यांनी प्रशासनाकडे आवश्यक हरकती व निवेदने सादर करून ग्रामस्थांची बाजू ठामपणे मांडली आहे.

**२ सप्टेंबरला होणार निर्णायक सुनावणी**

तहसील कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या नोटिशीनुसार, हरकतदारांना दिनांक ०२ सप्टेंबर २०२६ रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सुनावणीदरम्यान ग्रामस्थांना आपली बाजू, लेखी म्हणणे, आवश्यक कागदपत्रे आणि पुरावे सादर करण्याची संधी मिळणार आहे. या प्रकरणातील हरकती, पुरावे आणि सर्व बाजूंचा विचार करून प्रशासन पुढील निर्णय घेणार असल्याने बालदेवच्या ग्रामस्थांच्या लढ्याला आता अत्यंत महत्त्वाचे वळण मिळाले आहे.

> **■ या संदर्भात हरकतदार गजानन खरबडे यांनी अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक भूमिका मांडताना सांगितले—**
> **> "बालदेव गावातील ग्रामस्थांच्या आरोग्याशी आणि आमच्या पाल्यांच्या भविष्याशी आम्ही शासनाला खेळू देणार नाही. गावाच्या आरोग्याला, पर्यावरणाला आणि भविष्यास धोका निर्माण करणाऱ्या कोणत्याही निर्णयाला आमचा ठाम विरोध राहील. ग्रामस्थांच्या भावना आणि ग्रामसभेच्या निर्णयाचा शासनाने गांभीर्याने विचार करावा."**

ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर सुनावणीची तारीख निश्चित झाल्याने या आंदोलनाला आता निर्णायक टप्पा प्राप्त झाला आहे. २ सप्टेंबरच्या सुनावणीत ग्रामस्थांकडून कोणते मुद्दे आणि पुरावे सादर केले जातात तसेच प्रशासन या प्रकरणात कोणती भूमिका घेते, याकडे बालदेवसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# नांदगांव खंडेश्वर घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापनाच्या प्रकल्पाच्या जागेला जिल्हाधिकाऱ्यांची मंजुरी

**▸विदर्भ केसरी। नांदगांव खंडेश्वर**

### नगराध्यक्ष नगरसेवकांनी मानले जिल्हाधिकाऱ्यांचे आभार



**■ मा.जिल्हाधिकारी यांनी अनेक वर्षापासूनचा जागेचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याने शहरातून गोळा होणाऱ्या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट व शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाचे सुद्धा नियोजन करता येणार आहे दोन्ही विषयाचा डी.पी.आर तयार करण्याचे काम सुरू असून यामुळे शहरातील विकासाला चालना मिळणार असल्याने जिल्हाधिकारी यांना भेटून आभार मानले तसेच तहसीलदार तलाठी,मुख्याधिकारी निवृत्ती भालकर, स्वच्छता निरीक्षक प्रीतम सोनटक्के यांनी यशस्वी पाठपुरावा केल्याचे मत नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर यांनी व्यक्त केले.**

शहरातील नगर पंचायतच्या घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापनाच्या जागेचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होता नगर पंचायतीनी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करून अखेर सदर जागेला जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मान्यता देऊन हा प्रश्न मार्गी लावल्याने नगराध्यक्ष सौ.प्राप्ती मारोटकर व नगरसेवकांनी जिल्हाधिकारी यांना शॉल पुष्पगुच्छ देऊन आभार मानले. नगर पंचायत अस्तित्वात आली तेव्हा पासून शहरात घनकचरा व्यवस्थापनाचा प्रकल्पाच्या जमिनीचा प्रश्न १० वर्षांपासून प्रलंबित होता. शहरातील गोळा होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता जागा उपलब्ध नसल्याने स्वच्छतेवर प्रश्नाचिन्ह अनेक वर्षांपासून निर्माण झाला होते सन २०२६ मध्ये नगर पंचायतची निवडणूक होऊन नवनियुक्त नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक यांनी शासन स्तरावर व मुख्याधिकारी, स्वच्छता निरीक्षक यांचे यशस्वी पाठपुराव्याला अखेर यश आले असून मौजा बच्छाराजपुर येथील २ हेक्टर जागा घनकचरा व्यवस्थापना करिता व शहरातील सांडपाणी व्यवस्थापना करिता मौजे मुंड झुंझारराव १ हेक्टर जागेला मंजुरात दिली असून शहरातील स्वच्छता व आरोग्य विषयक विकासाच्या दृष्टीने शहराच्या विकासात भर पडणार आहे. १० वर्षांपासून प्रलंबित असलेला जागेचा प्रश्न मार्गी लावल्याने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची नुकतीच नगराध्यक्ष नगरसेवक यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार करीत आभार मानले यावेळी नगराध्यक्ष सौ प्राप्ती मारोटकर, उपनगराध्यक्ष अब्दुल जमीर, स्वच्छता सभापती सौ ज्योत्स्ना धवसे, सभापती कांता लोमटे,मो. रियाज, वासुदेव लोखंडे न.पं. गटनेते प्रकाश मारोटकर नगरसेवक सौ प्रीती इखार शीला वाडेकर आयेशा शेख रजियाबी सलाम मो. साजिद अमोल धवसे शेख हारून मो. शारुख इत्यादी उपस्थित होते.

## पोल्ट्रीधारकांचा १ सप्टेंबरला आयुक्तालयावर मोर्चा

**▸विदर्भ केसरी। विटा :**

"शासन निर्णय (जीआर) केवळ कागदावरच राहणार असेल, तर शेतकऱ्याने दाद कुठे मागायची?" असा संतप्त सवाल करत पोल्ट्रीधारकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. पोल्ट्रीधारकांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी येत्या १ सप्टेंबर रोजी पुणे येथील पशुसंवर्धन आयुक्तालयावर तब्बल १० हजार पोल्ट्रीधारकांचा मोर्चा काढण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने पशुपालक आणि पोल्ट्रीधारकांच्या हितासाठी २२ जुलै २०२४ आणि ३१ जुलै २०२५ रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केले होते. मात्र, या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याने पोल्ट्रीधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे. शासन निर्णयांची अंमलबजावणी करावी, तसेच पोल्ट्री व्यवसायासंदर्भातील विविध प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, या मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

### एकतर्फी कराराला विरोध

**■ पोल्ट्री कंपन्यांकडून शेतकऱ्यांवर लादले जाणारे एकतर्फी करार थांबवावेत, अशी प्रमुख मागणी आहे. शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व पोल्ट्री कंपन्यांसाठी नोंदणीकृत करारनामा बंधनकारक करण्यात यावा. त्यामुळे पोल्ट्री व्यवसायात नुकसान झाल्यास त्याचा संपूर्ण आर्थिक भार केवळ शेतकऱ्यांवर पडणार नाही, अशी पोल्ट्रीधारकांची भूमिका आहे.**

दैनिक
# विदर्भ केसरी
विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ | ४

## विदर्भ GOOD MORNING

!! मना-मनात दारा-दारात फक्त विदर्भ केसरी!!

## सर्वसामान्यांना महागाईची ओवाळणी

■ नवी दिल्ली : आखातात सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम देशातील इंधनांच्या दरांवरही होत आहे. कधी पेट्रोल-डिझेल, तर कधी एलपीजीच्या दरांमुळे सर्वसामान्यांचा खिसा कापला जात आहे. आता इंद्रप्रस्थ गॅस लिमिटेडने (आयजीएल) सीएनजीच्या दरामध्ये पुन्हा एकदा वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. आयजीएलने सीएनजीच्या दरामध्ये प्रति किलोमागे ३.८९ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला असून हे नवीन दर शनिवार सकाळपासून लागू होणार आहेत. यामुळे राजधानी दिल्लीमध्ये सीएनजीचे दर ८६.९८ प्रति किलोग्रॅम झाले आहेत. या दरवाढीमुळे सीएनजी वाहनधारकांच्या खिशावर अतिरिक्त ताण येणार आहे.



## महाराष्ट्रातील पोळा सण जवळ आला, पण शेतकरी चिंतेत?

विदर्भ केसरी । वार्तापत्र अरविंद चौधरी



**पोळा सण म्हटलं की शेतकऱ्याच्या मनात आनंद दाटून येतो. बैलांना सजवायचं, त्यांची पूजा करायची, घरात सणासुदीचं वातावरण असतं. पण यंदा पोळा सण जवळ आला असला तरी शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आनंदापेक्षा चिंतेचं सावट दिसतंय.**

अरे बाबा, शेतकऱ्याच्या हातात काय उरलंय? यंदा निसर्ग सुद्धा सरकार सारखा वागून राहिला आभाळ दाटून येत पन पाणी येत नाय,आज वरुण राजा ही शेतकऱ्यांना तुमची केव्हाय शी नाही म्हणून पाणी पडत च नाय असा करुन रायला , कधी दुष्काळ, कधी रोगराई तर कधी बाजारभावाचा फटका! जीव तोडून पिकं उभी केली, पण नुकसान झालं की पीकविमा मिळेना. कागदपत्रांच्या फेऱ्या मारून-मारून शेतकरी हैराण झाला, तरी मदत मिळत नाही. सरकारनं शेतकऱ्यांकडे लक्ष द्यायला पाहिजे. फक्त घोषणा करून भागत नाय हो! पीकविम्याची रक्कम वेळेवर मिळाली पाहिजे, नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीनं झाले पाहिजेत आणि शेतकऱ्याला योग्य मदत मिळाली पाहिजे.आज शेतकरी अक्षरशः वाऱ्यावर सोडल्यासारखा वाटतोय. एकीकडे कर्जाचा डोंगर, दुसरीकडे पिकाचं नुकसान आणि घरखर्चाची चिंता. अशा परिस्थितीत पोळ्याचा सण कसा साजरा करायचा, हा मोठा प्रश्न शेतकऱ्यापुढं उभा आहे. पोळा हा फक्त बैलांचा सण नाय, तर शेतकऱ्याच्या कष्टाचा आणि त्याच्या जिव्हाळ्याचा सण हाय. सरकारनं आता तरी शेतकऱ्याची चिंता समजून घ्यावी. शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडू नका; त्याला आधार द्या, पीकविमा द्या आणि त्याच्या कष्टाला न्याय द्या. कृषी प्रधान देश हाय आपला तो "बळीराजा जगला तरच देश जगंल; शेतकरी सुखी तरच खरा पोळा गोड होईल!"

# कुठे गेले चमकोगिरी करणारे नेते अन् कार्यकर्ते!

**चंद्रपूर जिल्हा वार्तापत्र - नरेंद्र सोनारकर**

चंद्रपूर- पत्रकार मुन्ना तावाडे यांच्या मालकीची नगर भू.क्रमांक ६६७९ ही जमीन चंद्रपूर महानगर पालिकेतील काही भ्रष्ट अधिकारी आणि कर्मच्यांनी संगनमत करून संघटित गुन्हेगारी करत या जमिनीवर अवैध कब्जा केल्याचे प्रत्येक कागदोपत्री पुराव्या नुसार सिद्ध झाल्या नंतरही श्री सार्वजनिक हनुमान आखाडा ही बोगस संस्था स्थापन करून धार्मिक दबाव निर्माण करत या जमिनीवरील अवैध कब्जा अद्याप हटविलेला नाही.ही बाब दैनिक विदर्भ केसरी च्या माध्यमातून उघड झाल्यानंतरही श्री हनुमान आखाड्याचा अवैध कब्जा काढण्यात न आल्याने जिल्हा प्रशासन अनुसूचित जातीच्या व्यक्तीवर गेली १२ वर्षापासून अन्याय,अत्याचार करत असताना जिल्ह्यातील संवेदनशील म्हणविल्या जाणाऱ्या कथित आंबेडकरवादी संघटना,पुरोगामित्वाचा उदोउदो करणाऱ्या सामाजिक संघटना,पत्रकारांच्या पाठीशी नेहमी संघर्षरत राहण्याची हमी देणारे तथाकथित पत्रकार संघ गेले कुठे..? असा सनसनाटी प्रश्न उपस्थित झाला असून पत्रकार मुन्ना तावाडे यांना स्वतःच्या मालकीच्या जागेवर ताबा मिळवण्यासाठी गचाळ व्यवस्थे सोबत एकाकी संघर्ष करावा लागत असेल तर या संघटना फक्त "फोटोछाप" प्रसिद्धीसाठी काम करतात का?असा यक्ष प्रश्न उपस्थित झाला आहे.

पत्रकार मुन्ना तावाडे यांनी चंद्रपूर महानगर पालिकेच्या हद्दीत असलेली जमीन १२ वर्षा अगोदर आपल्या वडिलोपार्जित संपत्तीतून खरेदी केली होती.त्या जमिनीचा मालकी हक्काचे सर्वच पुरावे मुन्ना तावाडे यांच्याकडे उपलब्ध आहे. मात्र महानगर पालिकेतील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करत बोगस संस्था बनवून मुन्ना तावाडे यांच्या मालकी हक्क असलेल्या जागेवर बोगस संस्थेचा अवैध कब्जा केला. त्या जागेवर धार्मिक संस्था दाखवून शून्य कर पावती लागू केली. अजूनही या जागेवरील अवैध कब्जा काढण्यात आला नाही.

जिल्ह्यात सत्ताधारी भाजप,काँग्रेस,राष्ट्रवादी अशा पक्षात अनुसूचित जातीसाठी वेगवेगळे सेल निर्माण करण्यात आले आहेत.व त्यांचे स्वतंत्र जिल्हा अध्यक्षही आहेत पण या प्रकरणात कोणत्याही पक्षाच्या अनुसूचित जातीच्या नेत्यांनी या प्रकरणाकडे पद्धतशीर पाठ फिरवल्याने सर्वच राजकीय पक्षातील अनुसूचित सेल च्या आघाड्या तूर्तास तरी बिनकामाच्या ठरत आहे.

जिल्ह्यात समता सैनिक दल आहे.अनुसूचित जातीच्या व्यक्तीवर किंवा कुटुंबावर अन्याय अत्याचार झाल्यास समता सैनिक दल त्या व्यक्ती च्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील या भूमिकेतून विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिस्तबद्ध अशा समता सैनिक दलाची स्थापना केली होती.पण १४ एप्रिल,६ डिसेंबरला डॉ.आंबेडकरांच्या पुतळ्या पर्यंत मार्च आणि सेल्युटेशन करणे एवढीच जबाबदारी या संघटनेची आहे काय?असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यातच रिपब्लिकन पार्टीच्या नावाने आपापली नेतेगिरी करणारे अनेक गटाचे नेते कार्यकर्ते,राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रपुरात आहेत.अनेक कार्यक्रमातून अन्याया विरुद्ध सिंहाची डरकाळी फोडणारे,बहुजन समाजाच्या अन्याय अत्याचार विरुद्ध शिबिर भरणारे,खा. चंद्रशेखर आझाद (रावण) यांच्या संघर्षाची प्रेरणा घेऊन आझाद समाज पार्टीत काम करणारे अनेक दिग्गज नेते,कार्यकर्ते



चंद्रपुरात आहेत.पण कुणालाही पत्रकार मुन्ना तावाडे यांच्यावर होत असलेला अन्याय अत्याचार दिसत नसल्याने या राजकीय सामाजिक संघटना दलीत,शोषित,पीडित वंचित यांच्यावरील अन्याय अत्याचार विरोधात लढणाऱ्या आहेत,की फक्त कार्यक्रमातून स्वतःची चमकोगिरी करणाऱ्या आहेत? असा प्रश्न आता सामान्य जनतेतून चर्चिल्या जात आहे

## कृषी ॲप्स व बियाण्यांच्या प्रकारांविषयी प्रात्यक्षिक संपन्न

▶विदर्भ केसरी।- अमरावती

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलंग्नित व श्रमसाफल्य फाउंडेशन, अमरावती द्वारा संचलित सौ. वसुधाताई देशमुख कृषी महाविद्यालय, बोडणा, अमरावती येथील सातव्या सत्रातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रम (RAWE) व AIA अंतर्गत ग्राम मसोद (ता. जि. अमरावती) येथे "महत्त्वाच्या कृषी ॲप्सची ओळख व बियाण्यांच्या प्रकारांविषयी प्रात्यक्षिक" आयोजित करण्यात आले.

या प्रात्यक्षिकामध्ये शेतकऱ्यांना शेतीसाठी उपयुक्त असलेल्या विविध कृषी ॲप्सची माहिती देण्यात आली. हवामान अंदाज, बाजारभाव, पीक व्यवस्थापन, कीड व रोग निदान, शासकीय योजना तसेच कृषीविषयक



तांत्रिक मार्गदर्शन मिळविण्यासाठी कृषी ॲप्सचा प्रभावी वापर कसा करावा, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी करून दाखविले. तसेच विविध प्रकारच्या बियाण्यांची ओळख करून देत संकरित (Hybrid), सुधारित (Improved), प्रमाणित (Certified), पायाभूत (Foundation) व सत्यप्रत (Truthfully Labelled) बियाण्यांमधील फरक, त्यांची वैशिष्ट्ये तसेच योग्य व दर्जेदार बियाण्यांची निवड करण्याचे महत्त्व शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले.

प्रात्यक्षिकादरम्यान कृषी ॲप्सचा योग्य वापर, त्याद्वारे उपलब्ध होणारी कृषीविषयक माहिती आणि विविध बियाण्यांची निवड करताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल कृषी साधनांचा प्रभावी वापर तसेच योग्य बियाण्यांची निवड केल्यास पीक व्यवस्थापन अधिक सुलभ होऊन उत्पादनवाढ साध्य करण्यास मदत होते, हे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले. या प्रात्यक्षिकास परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कृषी ॲप्सचा वापर करून शेतीविषयक अद्ययावत माहिती मिळविण्यास तसेच योग्य बियाण्यांची निवड करण्यास या उपक्रमाचा उपयोग होणार असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले. सदर प्रात्यक्षिक राबवण्यासाठी कार्यक्रमाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. वसुधाताई देशमुख तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय देशमुख यांनी प्रोत्साहन दिले. कार्यक्रम राबवण्यासाठी रावे कार्यक्रम समन्वयक सहा. प्रा. सौ. स्वाती देशमुख, मसोद गावचे प्रभारी व मसोद गावचे कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा. डॉ. हिमज देशमुख व रावे कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा. सौरभ इंगोले यांनी सहकार्य केले. सदर प्रात्यक्षिकासाठी विषय तज्ज्ञ डॉ. हिमज देशमुख आणि सहा. प्रा. सौरभ इंगोले यांचे तांत्रिक मार्गदर्शन लाभले.



## 'रक्षाबंधन ऋणानुबंध सोहळा'

▶विदर्भ केसरी। मूर्तिजापूर

"एक धागा विश्वासाचा, सण सामाजिक एकतेचा" या उदात्त भावनेतून मूर्तिजापूर येथील लकडगंज परिसरात 'रक्षाबंधन ऋणानुबंध सोहळा' अत्यंत सोहळापूर्वक व भावूक वातावरणात पार पडला. ज्येष्ठ समाजसेविका वैजयंता डोंगरदिवे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकारातून या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक सलोखा आणि बंधुभाव दृढ करणे हा या सोहळ्याचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते माजी आमदार स्व. तुकाराम बिडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. याप्रसंगी वैजयंता डोंगरदिवे यांनी स्व. बिडकर यांच्या प्रतिमेला राखी अर्पण करत कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी आमदार हरीश पिंपळे यांनी स्व. मा आमदार तुकाराम भाऊ बिडकर यांच्यासोबत च्या आठवणींना उजाळा दिला तसेच वैजयंता ताईंनी या ऋणानुबंधाच्या कार्यक्रमातून सामाजिक एकतेचा संदेश दिला असून हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे. असे विचार व्यक्त केले

## संघर्षाच्या राखेतून घडला यशस्वी प्रदीप कुटे

**यशोगाथा | "आई-वडिलांचे छत्र हरपले, पण स्वप्नांची ज्योत विझू दिली नाही**

▶विदर्भ केसरी। देऊळगाव राजा | प्रतिनिधी किशोर जामदार

जीवनात काही जखमा अशा असतात की त्या कधीच भरून येत नाहीत. आई-वडिलांचे प्रेम, त्यांचे मार्गदर्शन आणि डोक्यावरचे छत्र हरवणे ही कोणत्याही व्यक्तीसाठी सर्वात मोठी वेदना असते. अशाच दुःखद परिस्थितीत आयुष्याची वाटचाल सुरू ठेवत, असंख्य संकटांशी झुंज देत आणि अपार कष्टांच्या बळावर स्वतःचे वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा पी. के. इन्स्टिट्यूट ऑफ फोटोग्राफीचे संचालक प्रदीप कुटे यांनी विद्यार्थ्यांसमोर आपल्या संघर्षमय जीवनप्रवासाचे हृदयस्पर्शी कथन केले. महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष कै. श्रीमंत राजे राजेंद्रसिंह जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'टॉक शो' कार्यक्रमात बोलताना प्रदीप कुटे यांनी आयुष्यातील अनेक भावनिक क्षण



उलगडले.

आई-वडिलांचे छत्र हरपल्यानंतर आलेली पोकळी, आर्थिक अडचणी, अनिश्चित भविष्य आणि एकाकीपणाच्या काळोखातही त्यांनी हार मानली नाही. प्रत्येक संकटाला सामोरे जात त्यांनी आपल्या स्वप्नांना जिवंत ठेवले. "अनेकदा परिस्थिती इतकी कठीण होती की पुढचा दिवस कसा जाईल याचीही खात्री नव्हती. पण आई-वडिलांनी दिलेले संस्कार आणि त्यांनी पाहिलेली स्वप्ने मला सतत पुढे जाण्याची प्रेरणा देत राहिली," असे सांगताना त्यांच्या डोळ्यांत दाटलेले अश्रू उपस्थितांनाही भावूक करून गेले. फोटोग्राफीच्या क्षेत्रात सुरुवातीला साधनांची कमतरता, आर्थिक मर्यादा आणि अनुभवाचा अभाव अशा अनेक अडचणी होत्या. मात्र प्रत्येक अपयशाला त्यांनी शिकवण मानले. दिवस-रात्र मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि स्वतःवरील विश्वास यांच्या जोरावर त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, "कॅमेरा हातात असणे पुरेसे नाही; नजरेत सर्जनशीलता आणि मनात जिद्द असली पाहिजे. जीवनात कितीही संकटे आली तरी स्वप्नांवरचा विश्वास कधीही गमावू नका." त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाने उपस्थित विद्यार्थी भारावून गेले. अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले, तर काहींना आपल्या अडचणींवर मात करण्याची नवी प्रेरणा मिळाली. दुःख, संघर्ष, जिद्द आणि यश यांचा संगम असलेली प्रदीप कुटे यांची कहाणी उपस्थितांसाठी प्रेरणेचा दीप ठरली.

### समाजासाठी ठरला तो प्रेरणेचा दिप

■ **कार्यक्रमास महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव, ज्येष्ठ साहित्यिक रमेश नरोडे, सेवानिवृत्त शिक्षक दीपक नागरे, ॲड. विजय सुनगत, उद्योजक संजय डोळस यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**
**"आई-वडिलांचे छत्र हरपले तरी त्यांची स्वप्ने जपणारा मुलगा जेव्हा यशाच्या शिखरावर पोहोचतो, तेव्हा तो केवळ स्वतःचा नाही तर समाजासाठीही प्रेरणेचा दीप बनतो."**

## युवा टायगर फोर्सच्या मागणीला यश; पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती

**⏭ ३० जुलैच्या मागणीची आरोग्य विभागाकडून गंभीर दखल**

▶विदर्भ केसरी। पांढरकवडा | ता.प्र तौसिफ शेख,

येथील उपजिल्हा रुग्णालयात नागरिकांना दर्जेदार व तज्ज्ञ वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी युवा टायगर फोर्सच्या वतीने ३० जुलै २०२६ रोजी आरोग्य उपसंचालक,अकोला यांच्याकडे करण्यात आलेल्या मागणीला यश आले आहे.या मागणीची गंभीर दखल घेत आरोग्य विभागाने उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.शेखर दोरखंडे (MBBS, MD – Medicine) यांची नियुक्ती केली आहे.पांढरकवडा व परिसरातील नागरिकांना उपचारासाठी इतर शहरांमध्ये जावे लागू नये,तसेच उपजिल्हा रुग्णालयात आवश्यक त्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध



व्हाव्यात,यासाठी युवा टायगर फोर्सच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता.विशेषतः युवा टायगर फोर्सचे पदाधिकारी संजय झोटिंग यांनी तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची मागणी सातत्याने लावून धरली होती. दि.३० जुलै २०२६ रोजी आरोग्य उपसंचालक,अकोला डॉ.सुशील वाकचौरे यांच्याकडे युवा टायगर फोर्सचे संस्थापक अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्यात यावीत,तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी तसेच रुग्णालयात आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात,अशी मागणी केली होती.यावेळी युवा टायगर फोर्सचे संयोजक अंकित नैताम,गणेश बोरकुटे,संजय आत्राम आणि वाजिद कुरेशी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.या मागणीची दखल घेत उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे MBBS, MD (Medicine) तज्ज्ञ वैद्यकीय अधिकारी डॉ.शेखर दोरखंडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.त्यामुळे पांढरकवडा व परिसरातील नागरिकांना वैद्यकीय उपचाराच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार आहे. "जनतेच्या आरोग्याच्या प्रश्नासाठी केलेल्या मागणीला मिळालेले हे यश असून, उपजिल्हा रुग्णालयातील उर्वरित रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत आणि आवश्यक सर्व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात,यासाठी युवा टायगर फोर्सचा पाठपुरावा यापुढेही सुरू राहील," अशी भूमिका युवा टायगर फोर्सच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्याने युवा टायगर फोर्सच्या जनहिताच्या मागणीला आणखी एक यश मिळाले असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

# पालकमंत्री असलेल्या भावाच्या पाहुणचाराने बहिणी भारावल्या!

## मंत्री संजय राठोड यांच्याकडून लाडक्या बहिणींचा अनोख्या पद्धतीने सन्मान

▶विदर्भ केसरी।

बहीण – भावाच्या नात्याची वीण अधिक घट्ट करणाऱ्या रक्षाबंधनाचा सण शिवसेना महिला आघाडीच्या वतीने यवतमाळात हॉटेल समर्थ प्राईडमध्ये आज शुक्रवारी अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्यात जिल्ह्यातील शेकडो भगिनी सहभागी झाल्या होत्या. उपस्थित बहिणींना मंत्री संजय राठोड यांच्या वतीने विशेष पाहुणचार करण्यात आला. यावेळी सर्व भगिनींना पालकमंत्री संजय राठोड



यांच्यासह शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आग्रहाने भोजन वाढून हा सोहळा अधिकच गोड केला. पालकमंत्री असलेल्या भावाच्या या पाहुणचाराने उपस्थिती बहिणी भारावून गेल्या.

सोहळ्याची सुरुवात शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतीकात्मक पोस्टराला पहिली राखी बांधून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित महिलांनी राज्याचे पालकमंत्री संजय राठोड तसेच शिवसेनेच्या इतर सर्व पदाधिकाऱ्यांना रक्षाबंधनाची राखी बांधून भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा गोडवा जपला. यावेळी शिवसेना पश्चिम विदर्भ सहसंपर्क प्रमुख पराग पिंगळे, जिल्हा संपर्क प्रमुख हरिहर लिंगनवार, श्रीधर मोहोड, जिल्हाप्रमुख गजानन डोमाळे, राजुदास जाधव, यशवंत पवार, आशिष खुलसंगे, समन्वयक संजय हातगावर, लोकसभा यवतमाळ-वाशिम अध्यक्ष विशाल गणात्रा, युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर, महेश पवार आदी पदाधिकाऱ्यांना भनिनींनी राखी बाधंली.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे लाडक्या बहिणींचा करण्यात आलेला विशेष पाहुणचार. रक्षाबंधनाचा सोहळा सुरू होण्यापूर्वी पालकमंत्री संजय राठोड आणि शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत उपस्थित बहिणींच्या पंगतीत जाऊन त्यांना आदरपूर्वक भोजन वाढले.

### विशेष राख्या घेऊन महिला आघाडी मुंबईकडे रवाना

■ **यवतमाळ येथील हा स्नेहाचा व उत्साहाचा सोहळा पार पडल्यानंतर, शिवसेना महिला आघाडी जिल्हा संघटिका वैशाली मासाळ, दर्शना इंगोले आणि ज्योती वाघाडे या महिलांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमेला बांधलेल्या राख्या व काही महिलांनी तयार केलेले शेभेच्छा पोस्टकार्ड घेवून विमानाने मुंबईकडे रवाना झाल्या. मुंबईत पोहोचल्यानंतर शिवसेना पक्ष मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून या राख्या अत्यंत उत्साहात बांधण्यात आल्या. यवतमाळ ते मुंबई असा बहिणींच्या प्रेमाचा आणि विश्वासाचा हा धागा अनोखा रक्षाबंधन सोहळा म्हणून चर्चेचा विषय ठरला आहे. या सोहळ्यात जिल्ह्यातील सर्व तालुका महिला आघाडी प्रमुखांसह विविध महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.**

### बहिणींच्या आयुष्यात सुख, समृद्ध नांदो'

■ **'आज आमच्या लाडक्या बहिणी राखी बांधण्यासाठी आमच्याकडे आल्या असून, त्यांची सेवा करण्याची आणि त्यांचा पाहुणचार करण्याची संधी आम्हाला मिळाली, याचा आम्हाला मनापासून आनंद होत आहे. सर्व बहिणींच्या आयुष्यात सुख, समृद्ध नांदो', अशी भावना यावेळी पालकमंत्री संजय राठोड यांनी व्यक्त केली.**

## वृक्षारोपणातून पर्यावरणाचे संवर्धन

▶विदर्भ केसरी।भिगवण

निंबोडी ग्रामपंचायत सरपंच संतोष सोनवणे यांच्या वतीने शंभर देशी झाडांचे बारामती ॲग्रो चे चेअरमन राजेंद्र पवार यांच्या हस्ते निंबोडी मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. निसर्ग संवर्धनाचा केवळ नारा न देता प्रत्यक्ष कृतीतून आदर्श कसा उभा करावा, याचे मूर्तिमंत उदाहरण ग्रामपंचायत निंबोडी (ता. बारामती) यांनी घालून दिले आहे. निंबोडी येथील गावठाण व स्माशानभूमी परिसर येथे विविध नैसर्गिक प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे.

सरपंच संतोष सोनवणे यांनी त्यांच्या सांगितले की निंबोडी गावात मोकळी जागा असेल तेथे पूर्णपणे माळरान ठिकाणी झाडे लावून खऱ्या अर्थाने निसर्गाचे संगोपन करण्याचे ठरविलेले आहे. यात केवळ शोभेची झाडे न लावता वड, करंज, चिंच, सीताफळ, आवळा आणि पिंपळ यांसारख्या देशी वृक्षांना प्राधान्य देण्यात येणार आहे. बहुतेकदा वृक्षारोपण केवळ नावापुरते उरते, मात्र येथे ग्रामपंचायततिने शाश्वततेवर भर दिला आहे.शास्त्रीय पद्धतीने झाडे लागवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ही झाडे जगवण्यासाठी सरपंचांनी ठिबक सिंचनाद्वारे संगोपनाची आणि देखभालीची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीने घेतली आहे. बारामती ॲग्रो चे चेअरमन राजेंद्र पवार यांनी वृक्षारोपण करून निंबोडी गावातील दोन पाण्याचे फिल्टर बऱ्याच दिवसापासून बंद असल्याचे दिसल्याने दोन्ही फिल्टर प्लांट चालू करून देण्याचे करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच येथील छत्रपती हायस्कूल, जिल्हा परिषद शाळा,आरोग्य उपकेंद्र येथे पेव्हर ब्लॉक देण्याचे आश्वासन दिले आहे. बारामती

यावेळी निंबोडीचे सरपंच संतोष सोनवणे, माऊली बाड, उपसरपंच नामदेव बाड,पद्माकर गलांडे, संजय धुमाळ,भीमराव पवार,धनंजय धुमाळ,सलीम मुलाणी, मंगेश खंडागळे,गणेश खंडागळे,विष्णू देवकाते,दीपक ठोंबरे,केदार खडके,निलेश धायतोंडे,अनिल जगताप व ग्रामस्थ उपस्थित होते.

चंद्रपूर
BREAKING NEWS
TODAY GOOD MORNING
दैनिक विदर्भ केसरी — विदर्भाचा मानबिंदू
सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६


महत्त्वाचे



## इंटरव्हील क्लबतर्फे पोलीस स्टेशन गडचिरोली येथे रक्षाबंधन उत्साहात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली, दि. २९ ऑगस्ट : रक्षाबंधन सणाचे औचित्य साधून आज Innerwheel Club Of Gadchiroli च्या वतीने पोलीस विभागात अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन कार्यक्रम साजरा करण्यात आला. सकाळी ११.०० वाजता आयोजित या कार्यक्रमात क्लबच्या प्रेसिडेंट शिल्पा हेमके तसेच सेक्रेटरी शालू भुसारे, आय एस ओ प्रतिभा रामटेके, पोलीस निरीक्षक विनोदजी चव्हाण पोलीस स्टेशन गडचिरोली, पोलीस सहाय्यक निरीक्षक कृष्णा सोनुले , सी सी सी प्रतिभा धाईत, प्रोजेक्ट डायरेक्टर दिपाली काथवटे, व्हॉइस प्रेसिडेंट मंजू काबरा, ट्रेझरर सुधा राठी यांच्या उपस्थितीत घेण्यात आला. भगिनींनी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. २४ तास जनतेच्या रक्षणासाठी तत्पर असणाऱ्या पोलीस दलाचा हा सन्मान असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी उपस्थित पोलीस निरीक्षक विनोद चव्हाण यांनी अधिकाऱ्यांना सांगितले की, "ही राखी फक्त धागा नसून जनतेचा आमच्यावरील विश्वास आहे. या विश्वासाला आम्ही कधीही तडा जाऊ देणार नाही." अतिशय सुंदर उपक्रम इंनरव्हील क्लब ने घेतला. असे सांगितले. कार्यक्रमात पोलीस बांधवांना राखी बांधण्यात आली, तसेच त्यांच्या नि:स्वार्थ सेवेबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले. "तुम्ही सणाला घरी नसता, पण आम्ही सण साजरा करावा म्हणून रस्त्यावर उभे असता, तुम्ही जागता म्हणून आम्ही शांत झोपतो" या भावना प्रतिभा रामटेके यांनी प्रास्ताविकातून यावेळी व्यक्त करण्यात आल्या. यावेळी प्रशांत हेडाऊ मेजर, शंकर डांगे, मसराम, अश्विनी राऊत (पीएसआय), पूजा नैताम (पीएसआय), जनाबाई काकडे (पीएसआय), ऐश्वर्या शिंदे (पीएसआय) यांना राखी बांधण्यात आल्या. शिल्पा हेमके यांनी अध्यक्षीय भाषणातून सर्व सदस्यांचे कौतुक केले. अकरा वाजता महिलांची कामाची वेळ असते तरी आपण वेळ काढून उपस्थित झालात आपलं अनमोल सहकार्य वेळोवेळी मिळो असेही म्हटले. या प्रसंगी Innerwheel Club च्या सदस्या पिंकी राठी, सरस्वती परताणी, पुनम सूचक, वैशाली गौतमवार, विजया चव्हाण, कविता बारापात्रे, वैशाली बटुवार, स्मिता गभने, स्नेहा शिंदे,मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रम शांततापूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शीखा काबरा तर आभार प्रदर्शन पूजा नैताम(पोलिस कॉन्स्टेबल) तसेच प्रतिभा रामटेके यांनी मानले.



## ज्ञानाच्या दिशेने एक नवे पाऊल!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

देसाईगंज : दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी श्री कुलस्वामिनी लाताई भवानी माता देवस्थान, विसापूर वॉर्ड, देसाईगंज (वडसा) येथे नवीन वाचनालयाचा शुभारंभ आमदार श्री. रामदासजी मसराम यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासून ज्ञानाचा उपयोग उज्ज्वल भविष्यासाठी करावा, असे आवाहन केले. त्या प्रसंगी उपस्थित सभापती बाळुभाऊ माडूरवार, नगरसेवक तथा गटनेता विकास प्रधान, सरपंच सुरेश कुथे, प्रा कुथे सर, आनंद कांबळे, शंकर पिसे, सुरेश कुथे, अशोक धोटे, धनंजय धोटे, किरण बगाटे, मनोहर कुथे, देविदास कुथे, पंकज धोटे सर, उपस्थित होते.

# प्रसूतीनंतर मातामृत्यू, नवजात बाळानेही सोडला प्राण

## गडचिरोलीत आठ दिवसांत दुसरा माता मृत्यू ; उपचारातील विलंबाचा नातेवाईकांकडून आरोप..!

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : जिल्हा महिला व बाल रुग्णालयात प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्राव झाल्याने २८ वर्षीय महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. नाजुका दिवाकर राऊत (वय,२८ वर्षे ) रा. कोजबी ता. नागभीड जि. चंद्रपूर यांचा शनिवारी मध्यरात्री मृत्यू झाला. व त्यांच्या नवजात बाळाचाही प्रसूतीनंतर काही वेळातच मृत्यू झाला. आठ दिवसांत याच रुग्णालयात झालेला हा दुसरा मातामृत्यू आहे.

नाजुका दिवाकर राऊत यांना प्रसूतीसाठी बोदली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून २८ ऑगस्ट रोजी रात्री १.२३ वाजता गडचिरोली येथील जिल्हा महिला व बाल रुग्णालयात दाखल करण्यात आले. २९ ऑगस्ट रोजी सकाळी सहाच्या सुमारास त्यांची सामान्य प्रसूती झाली. त्यांनी अडीच किलो वजनाच्या बाळाला जन्म दिला.



जन्मानंतर काही वेळातच बाळाचा मृत्यू झाला. त्यानंतर सकाळी आठच्या सुमारास नाजुका यांना मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. रक्तस्त्राव वाढत गेल्याने त्यांची प्रकृती गंभीर बनली.

परिस्थिती लक्षात घेऊन ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रवीण किलनाके आणि डॉ. प्रशांत आखाडे यांना पाचारण करण्यात आले. डॉक्टरांनी रुग्णालयात दाखल होत महिलेची तपासणी केली. रक्तस्त्राव नियंत्रणात आणण्यासाठी शस्त्रक्रियेसह आवश्यक उपचार करण्यात आले. त्यानंतर रक्तस्त्राव थांबला आणि नाजुका यांना रक्त देण्यात आले.

दुपारी तीनच्या सुमारास त्यांच्या प्रकृतीत काहीशी सुधारणा झाल्याचे सांगण्यात आले. सायंकाळी सात ते आठ वाजेपर्यंत प्रकृती स्थिर होती. मध्यरात्रीनंतर अचानक त्यांना झटके येण्यास सुरुवात झाली व डॉक्टरांकडून उपचार सुरू असतांनाच रात्री दिड वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

### रक्त मिळण्यास विलंब : नातेवाईकांचा आरोप

■ महिलेची प्रकृती गंभीर असतांना रक्त उपलब्ध होण्याच्या प्रक्रियेत विलंब झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. उपचारातील कथित दिरंगाई आणि आरोग्य यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळेच माता आणि बाळाचा जीव गेला, असा दावा त्यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून नेमकी कारणे स्पष्ट करावीत, अशी मागणी नातेवाईकांनी केली आहे.

### आठवडाभरात दुसरी घटना

■ याच जिल्हा महिला व बाल रुग्णालयात आठ दिवसांपूर्वी चामोर्शी येथील जिजा सातर वय,२६ वर्ष या गर्भवती महिलेचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाला होता. त्या घटनेची चर्चा आणि त्याबाबतचे प्रश्न अद्याप कायम असतानाच नाजुका राऊत यांच्या मृत्यूची घटना समोर आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील माता मृत्यूचे प्रमाण, प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरची काळजी तसेच आपत्कालीन उपचार व्यवस्थेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या घटनेबाबत जिल्हा महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. माधुरी किलनाके यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# सुपगाव शाळेतील शिक्षकांच्या अनुपस्थितीची चौकशी झाली सुरु : बीडीओ संजय नैताम

## चार शिक्षक कार्यरत असतानाही एकही शिक्षक उपस्थित नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षकांविनाच बसण्याची वेळ

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गोंडपिपरी : तालुक्यातील सुपगाव येथील शनिवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शाळेची वेळ सुरू झाल्यानंतरही एकही शिक्षक उपस्थित नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत असलेल्या या शाळेत चार शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, शिक्षकांच्या अनुपस्थितीमुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांविनाच शाळेत बसावे लागले. या प्रकारामुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शाळेत पेटकर व मंगेश पेंदाम हे मुख्याध्यापक अनुपस्थित असताना या दोघांची रजा कोणी व कशी मंजूर केली, असा प्रश्न उपस्थित होत आहे. नेहमीप्रमाणे सकाळी विद्यार्थी वेळेवर शाळेत पोहोचले. मात्र, शाळेची वेळ होऊनही शिक्षक न आल्याने परिस्थिती गंभीर बनली. अखेर शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शाळेचे कुलूप उघडले; परंतु विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी एकही शिक्षक उपस्थित नव्हता. माहिती मिळताच संतप्त ग्रामस्थांनी शाळेत धाव घेतली. चार शिक्षक कार्यरत असताना एकही शिक्षक शाळेत उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. शिक्षकच वेळेवर शाळेत येत नसतील, तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य कोण घडवणार, असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासन कोट्यवधी रुपये खर्च करते, मात्र असे प्रकार घडत असतील तर या योजनांचा लाभ कसा मिळणार, अशी चर्चा परिसरात सुरू आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी शिक्षकांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

> “ विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारा हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. चार शिक्षक असताना एकही शिक्षक शाळेत उपस्थित नसणे ही बाब शिक्षण विभागासाठी लाजिरवाणी आहे. संबंधित शिक्षकांची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> — **राजू झाडे,** शहराध्यक्ष, काँग्रेस कमिटी, गोंडपिपरी




## भरधाव कारने दोघांना चिरडले, पोलिसांनी घेतले ताब्यात

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

नागपूर : जपानी गार्डन रोडवर आज पहाटे भीषण अपघात झाला. भरधाव वेगात असलेल्या एका कारने रस्त्यावरून जाणाऱ्या ज्येष्ठ नागरिकाला चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. कैलास सनोडिया असे या अपघातात प्राण गमावलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज पहाटेच्या सुमारास 3 गाड्या अत्यंत वेगाने एकमेकांशी शर्यत लावत जात असल्याचा संशय आहे. या शर्यतीदरम्यान एका भरधाव कारचा ताबा सुटला आणि ती थेट जपानी गार्डनच्या भिंतीवर जाऊन धडकली. याच वेळी रस्त्यावरून 'मॉर्निंग वॉक' करत जात असलेल्या कैलास सनोडिया यांना या कारने जोरदार धडक देऊन चिरडले. अपघातानंतर सोबत असलेल्या 2 कारचालकांनी मदतीसाठी न थांबता तेथून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अपघातात कारचा चक्काचूर झाला असून त्यातील एक व्यक्ती गाडीमध्येच अडकून पडली होती. पोलिसांनी त्वरित कारवाई करत दोन जणांना ताब्यात घेतले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, कारमधील चालकाने किंवा प्रवाशांनी मद्यपान केले असण्याची दाट शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिस या प्रकरणी अधिक तपास करत असून पळून गेलेल्या इतर दोन गाड्यांचा शोध सुरू आहे.



## छताचा भाग प्रवाशांच्या अंगावरच कोसळला

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अकोला : येथील बसस्थानकाच्या जीर्ण इमारतीतील छताच्या प्लास्टरचा मोठा भाग प्रवाशांच्या अंगावर कोसळल्याची घटना आज दुपारी ४.३० वा.च्या सुमारास घडली. या दुर्घटनेत अंबोडा ता. नांदुरा येथील दोन महिला व एक मुलगा तसेच भिलखेड ता. संग्रामपूर येथील एक महिला जखमी झाल्याची माहिती मिळाली असून जखमींवर स्थानिक शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बसस्थानकातील फलाट क्रमांक १० येथे काही प्रवासी बसलेले असतांना अचानक छतावरील प्लास्टरचा मोठा भाग त्यांच्या अंगावर कोसळला. अनपेक्षितपणे घडलेल्या या घटनेमुळे बसस्थानक परिसरात एकच खळबळ उडाली. अन्य प्रवाशांनी तातडीने जखमींच्या मदतीसाठी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच बसस्थानक प्रशासनातील कर्मचाऱ्यांनी जखमींना उपचारांसाठी शेगाव येथील सईबाई मोटे शासकीय



रुग्णालयात दाखल केले. जखमी महिलांवर रुग्णालयात उपचार करण्यात आले, तर बालकाला पुढील उपचारांसाठी अकोला येथे हलवण्यात आल्याची माहिती आहे.


शेगाव बसस्थानकाची इमारत जुनी आणि जीर्ण झाली असून विविध ठिकाणी छतावरील प्लास्टर निखळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दररोज हजारो प्रवासी या बसस्थानकाचा वापर करतात. त्यामुळे अशा घटना प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. बसस्थानकाच्या संपूर्ण इमारतीचे तातडीने संरचनात्मक परीक्षण करून धोकादायक भागांची दुरुस्ती करण्यात यावी.

# कुष्ठांतेयांच्या प्रतिष्ठेसाठी ग्रामसभेत सर्वानुमते ठराव पारित

## २५० हुन अधिक गावांचा ‘कुष्ठभयमुक्त व भेदभावमुक्त ग्राम’ संकल्प

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : कुष्ठरोगाविषयी असलेली भीती, गैरसमज, कलंक आणि सामाजिक भेदभाव दूर करून कुष्ठांतेयांना सन्मानाने व प्रतिष्ठेने जगता यावे, या उद्देशाने चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, पालघर व नंदुरबार जिल्ह्यात विशेष जनजागृती व ग्रामस्तरीय उपक्रम राबविण्यात येत आहे. सक्षम कुष्ठांतेय स्वाभिमानी संस्था, नागभीड व अलर्ट इंडिया, मुंबई यांच्या सहकार्याने सुरू असलेल्या या उपक्रमाला ग्रामसभांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत किमान २५० हुन अधिक गावांमध्ये "कुष्ठभयमुक्त व कुष्ठरोग भेदभावमुक्त गाव साठी" शपथ घेतलेली आहे. यावर्षी ऑगस्ट महिन्यात स्वातंत्र्यदिनी पार पडणाऱ्या 32 हुन अधिक ग्रामसभांनी याबाबत सर्वानुमते ठराव पारित करून आपल्या







गावात कुष्ठांतेयासोबत कोणत्याही प्रकारचा भेदभाव अथवा दुर्व्यवहार केला जाणार नाही, असा सामूहिक संकल्प केला आहे. या उपक्रमांतर्गत कुष्ठांतेयांनी ग्रामसभांमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी कुष्ठरोगामुळे कुटुंबात , समाजात आणि सार्वजनिक जीवनात येणाऱ्या भेदभावाच्या समस्या ग्रामस्थांसमोर मांडल्या. कुष्ठरोग हा उपचाराने बरा होणारा आजार असून, कुष्ठरोग झालेल्या व्यक्तीपासून दूर राहण्याची किंवा त्यांच्याशी भेदभाव करण्याची आवश्यकता नाही, याबाबत ग्रामस्थांमध्ये संस्थेच्या पदाधिकारी यांनी जनजागृती केली . योग्य उपचार व नियमित औषधोपचारामुळे कुष्ठरोगावर नियंत्रण मिळविता येते, हा संदेशही या अभियानातून देण्यात आला.

ग्रामसभांमध्ये सर्वानुमते पारित करण्यात आलेल्या ठरावानुसार गावात कोणत्याही कुष्ठांतेयांसोबत इतर कोणत्याही कारणावरून भेदभाव केला जाणार नाही. कुष्ठांतेयांना कुटुंबात , समाजात आणि सार्वजनिक जीवनात समान हक्क व सन्मान मिळावा, यासाठी ग्रामस्तरावर प्रयत्न करण्याचा निर्णय घेण्यात आला. गावात कुष्ठरोगाच्या कारणावरून भेदभाव किंवा दुर्व्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गांभीर्याने दखल घेऊन ग्रामपंचायत व तंटामुक्त समितीच्या माध्यमातून नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी हमीही ठरावातून देण्यात आली आहे.

### गावाच्या दर्शनी भागात जनजागृती फलक

■ कुष्ठरोगाविषयीची भीती व गैरसमज दूर करण्यासाठी गावाच्या दर्शनी भागात ‘हे गाव कुष्ठभयमुक्त व कुष्ठरोग भेदभावमुक्त आहे’ अशा आशयाचे जनजागृती फलक लावण्याचा निर्णयही ग्रामसभांमध्ये घेण्यात आला. कुष्ठांतेयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने सहभागी करून घेणे, त्यांच्यावरील सामाजिक कलंक दूर करणे आणि ग्रामस्तरावर समानता व मानवी प्रतिष्ठेचे वातावरण निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ‘कुष्ठरोगाविषयी भीती नको, भेदभाव नको; उपचार, स्वीकार आणि सन्मान हवा’, असा संदेश या ग्रामसभांच्या माध्यमातून चंद्रपूर, गडचिरोली,गोंदिया, पालघर व नंदुरबार जिल्ह्यातील गावामध्ये दिला.

गडचिरोली
BREKING NEWS
TODAY
GOOD MORNING
दैनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६

# प्रकल्प कार्यालयाचा अजब कारभार : शिक्षक झाले चौकीदार!

## ज्ञानदान करणाऱ्या शिक्षकांच्या हातात आता रात्रीची पहारेदारी ; मग आश्रमशाळांमध्ये चौकीदार, अधीक्षक आणि अधीक्षिका कशासाठी?

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

गडचिरोली : जपतलाई येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत विषारी साप चावल्याने तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटनेने आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेनंतर प्रशासनाने सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याऐवजी शिक्षकांनाच रात्रीच्या पहारेदारीच्या कामाला लावण्याचा अजब प्रकार सुरू केल्याची चर्चा आहे. त्यामुळे “शिक्षक झाले चौकीदार!” अशी संतप्त प्रतिक्रिया शिक्षकांमध्ये उमटत आहे. दिवसभर विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकांना सकाळी साडेदहा ते सायंकाळी पाचपर्यंत अध्यापन करावे लागते. त्यानंतर भोजनपाळी, अभ्यासपाळी आणि विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय कामांमध्ये सहभाग घ्यावा लागतो. एवढ्यावरही समाधान न मानता आता रात्री विद्यार्थ्यांच्या वसतिगृहावर पहारा देण्याची जबाबदारी शिक्षकांच्या माथी मारली जात असल्याचा आरोप होत आहे.तसेच हप्त्यातून शनिवार व रविवारला शिक्षकांना हक्काची साप्ताहिक रजा मिळत असते. या रजेत आपल्या वैयक्तिक , कौटुंबिक व आरोग्यविषयक जबाबदारी पार पाडावे लागते. परंतु ह्यायी दिवशी मुख्यालयी हजार राहावे असे आदेश वरीष्ठ स्तरावून दिले जाते. मग आपले वैयक्तिक कामे कधी करावीत? विशेष म्हणजे, आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी चौकीदारांची स्वतंत्र पदे आहेत. अधीक्षक-अधीक्षिकांचीही नियुक्ती करण्यात आलेली आहे. मग ही पदे नेमकी कशासाठी? संबंधित कर्मचाऱ्यांची कामे शिक्षकांनीच करायची असतील, तर स्वतंत्र पदांवर मनुष्यबळ आणि निधी खर्च करण्यामागचा उद्देश काय, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. रात्री व्हिडिओ कॉलवरून ‘हजेरी’ तपासणी? गडचिरोली आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून रात्रीच्या वेळी व्हिडिओ कॉल करून आश्रमशाळांमध्ये शिक्षक उपस्थित आहेत की नाही, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहात पहारा आहे की नाही, याची शहानिशा केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी निश्चित करण्याऐवजी शिक्षकांची रात्रीची उपस्थिती तपासण्यावर प्रशासनाचा भर असेल, तर हा उपाय कितपत परिणामकारक आहे? हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी प्रशिक्षित सुरक्षा कर्मचारी, पुरेशी प्रकाशव्यवस्था, वसतिगृहांची नियमित तपासणी, सर्पप्रतिबंधक उपाययोजना, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा आणि तातडीची प्रतिसादव्यवस्था निर्माण करणे अपेक्षित आहे. त्याऐवजी शिक्षकांना रात्रपाळी लावणे हा समस्येवरील कायमस्वरूपी उपाय होऊ शकत नाही. शिक्षक की चौकीदार?




### दुर्घटनेनंतर दोषींवर कारवाई की शिक्षकांवर जबाबदारी?

■ जपतलाई येथील दुर्दैवी घटनेनंतर आश्रमशाळांच्या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. वसतिगृह परिसरातील सुरक्षा, स्वच्छता, प्रकाशयोजना, सापांचा वावर रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजना, आपत्कालीन उपचार व्यवस्था आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांची तपासणी झाली पाहिजे.

प्रशासनाच्या व्यवस्थेतील त्रुटींची किंमत शिक्षकांकडून अतिरिक्त ड्युटी करून वसूल करणे हा न्याय नाही.शिक्षकांना दोषी ठरवून अथवा त्यांच्यावर अतिरिक्त जबाबदाऱ्या टाकून विद्यार्थ्यांची सुरक्षा निश्चित होणार नाही. त्यासाठी सक्षम आणि कायमस्वरूपी सुरक्षा व्यवस्था उभी करावी लागेल.

### प्रश्न शिक्षकांचा नाही, संपूर्ण शिक्षणव्यवस्थेचा आहे!

■ आज शिक्षक रात्री पहारा देत आहेत; उद्या त्यांच्यावर स्वयंपाकघराची जबाबदारी, परवा कार्यालयीन काम आणि त्यानंतर आणखी एखादी गैर-अध्यापनाची जबाबदारी सोपवली जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. अशा पद्धतीने शिक्षकांवर कामाचा बोजा वाढत गेला, तर त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणार आहे. शिक्षकांना शिक्षक म्हणून काम करू द्या. चौकीदाराचे काम चौकीदाराकडून, अधीक्षकाचे काम अधीक्षकाकडून आणि प्रशासनाचे काम प्रशासनाकडून करून घ्या. गडचिरोली प्रकल्प कार्यालयाने तातडीने या प्रकाराची दखल घेऊन शिक्षकांवरील अनावश्यक रात्रपाळी आणि पहारेदारीची जबाबदारी पुनर्विचारात घ्यावी. आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या चौकीदार, अधीक्षक-अधीक्षिका आणि इतर कर्मचाऱ्यांची जबाबदारी स्पष्ट करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र, सक्षम आणि २४ तास कार्यरत सुरक्षा यंत्रणा उभी करावी. कारण प्रश्न केवळ शिक्षकांच्या कामाचा नाही; प्रश्न आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा आहे. ज्ञानाच्या मंदिरात शिक्षकांच्या हातात खडू शोभतो, पहारेकऱ्याची काठी नव्हे!

शिक्षकांचे मुख्य काम विद्यार्थ्यांना ज्ञान देणे, त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे, संस्कार घडवणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे हे आहे. मात्र शिक्षकांचा वेळच जर पहारेदारी, भोजन व्यवस्था आणि इतर गैर-अध्यापन कामांमध्ये खर्च होत असेल, तर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर त्याचा परिणाम होणार नाही का? एकीकडे आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शासन कोट्यवधी रुपयांच्या योजना राबवित असल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे त्याच विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांना अध्यापनापासून दूर करून रात्रीच्या पहारेदारीला लावले जात असेल, तर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे उद्दिष्ट कसे साध्य होणार?

## महत्त्वाचे

### कराडमध्ये अल्पवयीन मुलांना विवस्त्र करून पोलिसांनीच केले चित्रीकरण

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी




कराड शहर पोलिस ठाण्यात पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्याने ३ अल्पवयीन मुलांसोबत अत्यंत घृणास्पद कृत्य केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. कॉलेजमधील किरकोळ मारामारीच्या चौकशीसाठी या मुलांना बोलावण्यात आले होते. मुलांच्या तक्रारीनुसार, रात्री खोलीचा दरवाजा बंद करून शिवीगाळ करत विवस्त्र करण्यात आले. अधिकाऱ्यांनी त्यांना मोबाईलवर अश्लील चित्रफिती दाखवल्या आणि एकमेकांच्या गुप्तांगावर मारहाण करण्यास भाग पाडले. पोलिसांनी या संपूर्ण प्रकाराचे मोबाईलवर चित्रीकरण केल्याचे म्हटले आहे.
या प्रकारानंतर पीडित मुलाने व त्याच्या कुटुंबीयांनी सातारा पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे आणि बालकल्याण समितीकडे तक्रार केली आहे. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशारा कुटुंबाने दिला आहे. या गंभीर घटनेमुळे सातारा पोलिस दलाची प्रतिमा मलिन झाली असून, पोलिस अधीक्षक संबंधितांवर काय कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

### वैद्यकीय प्रवेशाच्या गुणवत्ता यादीत आरक्षणावर सीईटी सेलचा डल्ला

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी



औरंगाबाद : एकीकडे मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी राज्यभरात रान पेटवले, तर दुसरीकडे ज्यांना आधीपासूनचे घटनादत्त आरक्षण आहे, अशा विद्यार्थ्यांचे आरक्षण सीईटी सेलने परस्पर संपुष्टात आणले. सीईटी सेलने एमबीबीएस, बीडीएस या (ग्रूप-ए) वैद्यकीय प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी 28 ऑगस्टला प्रसिद्ध केली. धक्कादायक म्हणजे जालन्याच्या (ता. बदनापूर) आदित्य हरी कोल्हे या विद्यार्थ्याला तात्पुरत्या गुणवत्ता यादीत ‘एनटी-सी’साठी पात्र ठरवले. नंतर लगेच ‘ओबीसी’ नव्हे थेट ‘ओपन’ गटात टाकले. यश खारुळे हा ‘एससी’ विद्यार्थी. त्यालाही ‘ओपन’ केले. संभाजीनगरच्या शिवाजीनगरातील नित्या ठेंगरे या विद्यार्थिनीला तर ओएमएससी अर्थात आऊटसाइड महाराष्ट्र स्टेट कॅंडिडेट घोषित केले. त्यामुळे 30 ऑगस्टला जाहीर झालेल्या यादीत तिघांही विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागले. छत्रपती संभाजीनगरात असे शेकडो विद्यार्थी आहेत. आदित्य कोल्हेच्या ‘एनटी-सी’ कॅटेगरीतील रँक 1,39,088 आहे. या रँकवर बीडीएसमध्ये चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश नक्की होणार होता. मात्र त्याला थेट ‘ओपन’ केल्यामुळे त्याचा ऑल इंडिया रँक 2,97,103 झाला. त्यामुळे त्याचा पहिल्या यादीत प्रवेश होऊ शकला नाही. आदित्य पूर्णपणे हताश झाला. तो म्हणाला, ‘ सीईटी सेलने माझ्या भवितव्याशी खेळ केला. शासनाने 6 महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्र देण्याची सवलत दिली आहे. मी 2 जुलैला जात वैधतेसाठी अर्ज केला. काही दिवसांत मला प्रमाणपत्र मिळेलच. पण मी आता स्पर्धेबाहेर गेलो.’

## उद्घाटनाआधीच रस्त्याला भेगा; तऱ्हाळा-पांगरी मार्गाचा फज्जा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

अमरावती : तालुक्यातील तऱ्हाळा ते पांगरी महादेव हा मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याचे काम पुन्हा एकदा गंभीर वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून नव्याने उभारला जात असलेल्या या रस्त्याचे काम अद्याप पूर्णही झालेले नाही. तोच तयार झालेल्या भागाला ठिकठिकाणी मोठमोठे तडे गेल्याचे समोर आले आहे. रस्त्याची ही दुरवस्था पाहून वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा, तांत्रिक गुणवत्ता यावर प्रशासकीय वर्तुळात तसेच ग्रामस्थांमध्ये तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या मार्गाच्या निकृष्ट कामाविरोधात, संथ गतीविरोधात गावकऱ्यांनी यापूर्वी अनेकदा तक्रारी केल्या होत्या. त्यांनी आंदोलनाचा इशाराही दिला होता. वाढत्या जनक्षोभाची दखल घेत २३ मे २०२६ रोजी मंगरूळपीरच्या तहसीलदारांच्या उपस्थितीत ग्रामस्थ व कंत्राटदाराच्या प्रतिनिधींची विशेष बैठक पार पडली होती. या बैठकीत कंत्राटदाराचे प्रतिनिधी जगदीश मुठाळ यांनी दोन दिवसांत काम सुरू करून पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, आश्वासनानंतर घाईघाईत उरकण्यात आलेल्या या कामात गुणवत्तेचा पुरता बोजवारा उडाल्याचे आता उघडकीस आले आहे. पावसाळ्यापूर्वीच रस्त्याला पडलेल्या या भेगांमध्ये पाणी साचल्यास हा मार्ग अधिकच खराब होण्याची भीती व्यक्त होत आहे. भविष्यात अपघातांना आमंत्रण मिळण्याचीही शक्यता आहे. त्यामुळे संबंधित रस्ते विकास विभागाने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी भेट द्यावी. संपूर्ण रस्त्याची निष्पक्ष तांत्रिक तपासणी करावी. दोषी कंत्राटदार, संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी. काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून घ्यावे. अशी जोरदार मागणी तऱ्हाळा व पांगरी महादेव परिसरातील संतप्त नागरिकांकडून केली जात आहे. ‘संबंधित कंत्राटदाराला कोणाचे अभय?’ सुरुवातीपासून कामाचा ढासळलेला दर्जा, बंद पडलेले काम, नागरिकांचा तीव्र विरोध आणि आता प्रत्यक्ष रस्त्यालाच पडलेले तडे या सर्व प्रकारामुळे प्रशासकीय यंत्रणा आणि कंत्राटदाराच्या संगनमतावर ग्रामस्थांनी संशय व्यक्त केला आहे. नियमांची पायमल्ली करणाऱ्या या कंत्राटदाराला नेमके कोणाचे अभय आहे? असा रोखठोक सवाल नागरिक विचारत असून, संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्याची मागणी होत आहे.



## व्याहाड (खुर्द) येथे मधमाशांच्या हल्ल्यात पतीचा झाला मृत्यू ; पत्नी गंभीर जखमी

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी


मृतक - महिपाल येरमा जखमी - शालू येरमा

सावली : (दिनांक, 30/08/2026 रविवार ) शेतात निंदणाचे काम करीत असताना मधमाशांच्या हल्ल्यात पतीचा मृत्यू,तर पत्नी जखमी झाल्याची घटना व्याहाड खुर्द येथील शेतात घडली. महिपाल कचरू येरमा वय, ५५ वर्ष असे मृत शेतमजुराचे नाव असून त्यांची पत्नी शालू महिपाल येरमा वय,५० वर्ष जखमी झाली आहे.शालू यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. महिपाल येरमा आणि त्यांची पत्नी शालू हे शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. महिपाल यांनी मनोहर डोंगरे यांची शेती ठेक्याने घेतली होती. सध्या खरीप हंगाम सुरू असून शेतातील रोवणीचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे शेतात वाढलेले निंदण काढण्यासाठी दोघेही सकाळी नऊच्या सुमारास शेतात गेले होते. दोघेही शेतात निंदण काढत असताना शेतालगतच्या झाडावर असलेल्या पोळ्यातील मधमाशांनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला. मधमाशांनी मोठ्या संख्येने हल्ला केल्याने दोघांनीही तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, मधमाशांपासून बचाव करण्यासाठी त्यांनी जवळच असलेल्या कालव्यातील पाण्यात डोके बुडवून स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला.या दरम्यान महिपाल येरमा बेशुद्ध पडले. शालू यांनी मदतीसाठी आरडाओरड सुरू केली. त्यांचा आवाज ऐकून राजोली चक येथील एक व्यक्ती घटनास्थळी धावून आली. त्यानंतर शालू यांच्या घरच्यांशी मोबाइलवरून संपर्क साधून मुलांना घटनास्थळी बोलावण्यात आले. मुलांनी घटनास्थळी पोहोचून बेशुद्ध अवस्थेत असलेल्या वडिलांना तातडीने व्याहाड येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, महिपाल यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी गडचिरोली येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. पती-पत्नीवर तत्काळ उपचार सुरू करण्यात आले. उपचारादरम्यान महिपाल यांचा मृत्यू झाला. शालू यांच्यावर उपचार सुरू आहेत. खरीप हंगामातील कामाला गेलेल्या शेतकरी कुटुंबावर मधमाशांच्या हल्ल्यामुळे काळाचा घाला आल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जाळीत अडकलेल्या बिबट्याची थरारक सुटका

### रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी; नागरिकांना दिलासा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

पुलगाव : येथील सीएडी कॅम्प परिसरात संरक्षक जाळीत बिबट्या अडकल्याची माहिती मिळताच वन विभागाच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जाळीत अडकलेल्या बिबट्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वन विभाग, पशुवैद्यकीय अधिकारी आणि वन्यजीव संरक्षण संस्थेच्या समन्वयातून अत्यंत सावधगिरीने रेस्क्यू ऑपरेशन राबवून बिबट्याची सुखरूप सुटका करण्यात आली.

उपवनसंरक्षक हरविर सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. पीपल्स फॉर ॲनिमल्स, वर्धा आणि वन विभागाच्या पथकाने संयुक्तरीत्या बचावकार्य केले. बिबट्याला सुरक्षितपणे नियंत्रित केल्यानंतर पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून त्याची तपासणी करण्यात आली. त्याची प्रकृती समाधानकारक असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून त्याला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले. या कारवाईत सीएडी कॅम्पचे आयएसओ कॅप्टन चिराग, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अमित झा, पीपल फॉर ॲनिमलचे आशिष गोस्वामी, कौस्तुभ गावंडे, डॉ. अक्षय गिरी यांच्यासह वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, क्षेत्र सहाय्यक व्ही. एम. नरांजे, वनरक्षक के. डी. राठोड, माधव माने, अरुण गीते, पारस बडदे, वैशाली खोंडे आणि पूजा पूयेड यांनी सक्रिय सहभाग घेतला.



## आई-वडिलांसह फिरायला गेलेल्या दोन सख्ख्या भावांचा तानसा नदीपात्रात बुडून मृत्यू; कुटुंबावर शोककळा

▸विदर्भ केसरी प्रतिनिधी

ठाणे : जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी जवळील अकलोली येथे तानसा नदीपात्रात बुडून दोन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. रविवारच्या सुट्टीनिमित्त कुटुंबासोबत फिरण्यासाठी आलेल्या या मुलांना पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांच्यावर काळाने झडप घातली. एकाच घरातील दोन मुलांचा अंत झाल्याने परिसरात मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे. विरार येथे वास्तव्याला असलेले रिक्षाचालक राम बच्चन चौहान हे पत्नी, दोन मुले आणि एका लहान मुलीसह रविवारी वज्रेश्वरी परिसरात आले होते. अकलोली येथील गरम पाण्याच्या कुंडावर आंघोळ केल्यानंतर हे कुटुंब तानसा नदीपात्राजवळ गेले. कुटुंबातील सर्वजण सुट्टीचा आनंद लुटत असतानाच या कुटुंबावर अचानक हे मोठे संकट कोसळले.

नदीच्या पात्रात उतरलेली दोन्ही मुले खेळता खेळता थोडी आत गेली. पाणी खोल असल्याने आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने ती बुडू लागली. नेमक्या याच वेळी आई काहीतरी खाण्यासाठी आणायला गेली होती, तर वडील रिक्षा साफ करत होते. काही वेळाने मुले दिसत नसल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी आरडाओरड केली. त्यानंतर स्थानिक तरुणांनी शोध घेऊन तासभराने या दोन्ही मुलांना बाहेर काढले, मात्र नाकातोंडात पाणी गेल्याने त्यांचा मृत्यू झाला होता.

अरुण राम बच्चन चौहान (वय 13) आणि आयुष राम बच्चन चौहान (वय 10) अशी या मृत सख्ख्या भावांची नावे आहेत. डोळ्यांदेखत दोन्ही मुलांचे मृतदेह पाहून आई-वडिलांनी नदीपात्राजवळच हंबरडा फोडला. या हृदयद्रावक घटनेमुळे अकलोली आणि वज्रेश्वरी परिसरात शोककळा पसरली असून, गणेशपुरी पोलिस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. दरम्यान, ठाणे जिल्ह्यातील कळवा खाडीत असलेल्या रेतीबंदर गणेश घाट येथेही अशीच एक मोठी दुर्घटना घडली.

दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या तीन तरुणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हे तिघेही मुंब्रा येथील ठाकूर पाडा परिसरातील रहिवासी होते. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, एकाच दिवशी घडलेल्या या दोन वेगवेगळ्या घटनांमुळे संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

